



# गोदातीर समाचार

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com
RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026






* वर्ष ६४ वे * अंक ४८ * नांदेड * बुधवार, दि. १९ फेब्रुवारी २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


# राज्याचं अर्थसंकल्पीय अधिवेशन ३ मार्चपासून

## अर्थसंकल्प १० मार्चला सादर होणार



**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्याचं अर्थसंकल्पीय अधिवेशन ३ मार्चपासून सुरु होणार आहे. ३ मार्च ते २१ मार्च या कालावधीत हे अधिवेशन पार पडणार आहे. तसेच १० मार्च रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार राज्याचा अर्थसंकल्प विधिमंडळात सादर करणार आहेत. त्यानंतर दुसऱ्या दिवसापासून अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा सुरु होईल. दरम्यान, अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी राज्यपालांचं अभिभाषण होईल. त्यानंतर राज्यपालांच्या अभिभाषणावर दोन दिवस चर्चा होणार आहे. तसेच त्यानंतर पुरवणी मागण्या मांडल्या जाणार आहेत.

केंद्र सरकारचा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर आता महाराष्ट्राचा अर्थसंकल्प सादर होणार असल्यामुळे संपूर्ण राज्याचं लक्ष याकडे लागलं आहे. या अर्थसंकल्पात मोठ्या घोषणा होण्याची शक्यता आहे. विधानसभेच्या निवडणुकीनंतर राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीचं सरकार सत्तेत आलं. त्यामुळे या अर्थसंकल्पामधून सर्वसामान्य जनतेला काही दिलासा मिळणाऱ्या घोषणा होतात का? याकडे अनेकांचं लक्ष लागलं आहे.

दरम्यान, महायुती सरकारचं हे अर्थसंकल्पीय अधिवेशन जवळपास तीन आठवडे चालणार आहे. या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सरकारकडून शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या काही घोषणा होणार का? याची शेतकऱ्यांना अपेक्षा लागली आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी, सोयाबीन आणि कापूस दरवाढ, सोयाबीन आणि कापूस खरेदीबाबत काही ठोस निर्णय होईल का? तसेच पीक विमा या मुद्यांवर सरकार काही घोषणा करणार का? हे पाहणंही महत्वाचं ठरणार आहे.

विधानसभा निवडणुकीच्या आधी महायुती सरकारने राज्यातील महिलांसाठी लाडकी बहीण योजना सुरू केली होती. या योजनेच्या माध्यमातून लाभार्थी महिलांना दर महिन्याला १५०० रुपये त्यांच्या खात्यावर देण्यात येतात. मात्र, लाडकी बहीण योजनेच्या १५०० रुपयांऐवजी २१०० रुपये देण्यात येणार असल्याची घोषणा महायुतीच्या नेत्यांनी केली होती. मात्र, अद्याप या घोषणेची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे आता अर्थसंकल्पीय अधिवेशनात लाडकी बहीण योजनेबाबत काही घोषणा करण्यात येणार का? याकडे लाडक्या बहिणींचं लक्ष लागलं आहे.

## मुख्य निवडणूक आयुक्तपदी ज्ञानेश कुमार



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** ज्येष्ठ सनदी अधिकारी ज्ञानेश कुमार यांची देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तपदी निवड करण्यात आली आहे. सध्याचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्याकडून १९ फेब्रुवारी रोजी ते पदभार स्वीकारतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यांच्या निवड समितीने ज्ञानेश कुमार यांच्या नावाला मंजूरी दिली. त्यानंतर विधी व न्याय मंत्रालयाकडून याबाबतचा शासन निर्णय सोमवारी रात्री काढला. ज्ञानेश कुमार यांचा कार्यकाळ २६ जानेवारी २०२९ पर्यंत असणार आहे. देशाचे २६ ने निवडणूक आयुक्त म्हणून ज्ञानेश कुमार या वर्षाच्या शेवटी बिहार विधानसभा निवडणूक आणि २०२६ साली केरळ आणि पद्दुचेरी येथील विधानसभा निवडणुकांवर देखरेख ठेवतील.

## राज्यात ९ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

### राजेश देशमुख उत्पादन शुल्क आयुक्त

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा धडाका सुरूच असून आताही नऊ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले आहेत. त्यामध्ये कोकण विभागीय आयुक्त राजेश देशमुख यांची राज्य उत्पादन शुल्क आयुक्त पदावर बदली करण्यात आली आहे. तसेच त्यांच्याकडे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या कार्यालय सचिव पदाचा अतिरिक्त कार्यभारही सोपवण्यात आला आहे.

डॉ. विजय सूर्यवंशी आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांची विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. राजेश देशमुख विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांना आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई नियुक्त करण्यात आले आहे. नयना गुंडे आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांची, महिला व बाल आयुक्त, पुणे म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. विमला आर. राज्य प्रकल्प संचालक, समग्र शिक्षा अभियान, मुंबई यांची निवासी आयुक्त आणि सचिव, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. सिद्धराम सलीमठ जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांची साखर आयुक्त, पुणे म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मिलिंदकुमार साळवे यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. सचिन ओंबासे जिल्हाधिकारी, धाराशिव यांची सोलापूर महानगरपालिका, सोलापूर महानगरपालिका आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. लीना बनसोड व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांची आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राहुल कुमार मीना प्रकल्प अधिकारी, गडचिरोली, आणि सहायक जिल्हाधिकारी, गडचिरोली उपविभाग, गडचिरोली यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिप, लातूर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या नऊ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

## संतोष देशमुखांची हत्या अनैतिक संबंधातून दाखवण्याच्या कटाचा आरोप

**बीड (प्रतिनिधी)–** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाला वेगळंच वळण देण्याचा कट खुद्द बीड पोलिसांनीच रचला होता, संतोष देशमुखांची हत्या ही अनैतिक संबंधातून झाल्याचं दाखवण्याचा प्रयत्न होता. त्यासाठी कळंब मध्ये एक बाईही तयार ठेवण्यात आली होती असा आरोप धनंजय देशमुखांनी केला आहे. गावकऱ्यांच्या जागरुकतेमुळे पोलिसांचा हा कट उधळून लावण्यात आला. या प्रकरणात पोलिसांनी आपली दिशाभूल केल्याचा आरोप धनंजय देशमुख यांनी केला.

विशेष म्हणजे, भाजपचे आमदार सुरेश धस यांनी विधानसभेत हा मुद्दा पहिल्यांदा मांडताना या प्रकरणाचा उल्लेख केला होता. कळंबमध्ये एक महिला तयार ठेऊन संतोष देशमुखांना बदनाम करण्याचा कट होता असा आरोप त्यांनी केला होता.

## हार्दिक शुभेच्छा!



हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची आज जयंती. त्यानिमित्त त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन व जयंतीनिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

**– संपादक**

## शहरातील शुक्रवार ते रविवार पर्यंतचे आठवडी बाजार राहणार बंद

### सोमवार २४ फेब्रुवारी रोजी भरतील हे बाजार

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यस्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा येत्या २१, २२ व २३ फेब्रुवारी रोजी नांदेड शहरात पार पडणार आहेत. त्याअनुषंगाने नांदेड शहरात शुक्रवार २१, शनिवार २२, रविवार २३ फेब्रुवारी रोजी भरणारे आठवडी बाजार बंद राहणार आहेत. हे आठवडी बाजार सोमवार २४ फेब्रुवारी रोजी भरणार आहेत. याबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी मंगळवारी आदेश निर्गमीत केला आहे.

या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी राज्यातून जवळपास ३ हजार अधिकारी-कर्मचाऱ्यांची उपस्थिती राहणार आहेत. श्री गुरुगोविंदसिंघजी स्टेडियम तसेच यशवंत कॉलेज मैदान या परिसरात या स्पर्धा होणार आहेत. स्पर्धेच्या ठिकाणच्या मार्गात अडथळा निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन सार्वजनिक शांतता भंग होऊ नये, यासाठी मार्केट अँड फेअर ॲक्ट १८६२ चे कलम ५ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी हा आदेश काढला आहे.

## सोन्याचे दर लवकरच ९० हजारांवर पोहचणार?

**मुंबई (प्रतिनिधी)–** सोन्याच्या वाढत्या किंमती ग्राहकांची चिंता वाढवणारे आहे. ज्या वेगाने सोन्याच्या किंमती गगनाला भिडत आहेत त्यामुळं ग्राहकांचे टेन्शन वाढले आहे. एमसीएक्सवर सोन्याचे दर ३७१ रुपयांनी वाढले आहेत. त्यामुळं सोनं प्रतितोळा ८६, ९५० रुपयांवर पोहोचले आहे. तर चांदी २२० रुपयांना महाग होऊन ९५, ८०० रुपयांवर ट्रेड करत आहेत. ज्या प्रमाणे सोन्याचे दर वाढत आहेत त्यानुसार लवकरच सोनं ९० हजारांचा आकडा गाठू शकते. तसंच, चांदीदेखील १ लाखांचा भाव पार करु शकते. सराफा बाजारात २२ कॅरेट सोनं ३०० रुपयांनी महागलं आहे. तर चांदी ९५, ६०० रुपयांवर स्थिर आहे. कच्चा तेलात १ टक्कांची तेजी आली असून हे ७५ डॉलर प्रति बॅरलच्यावर व्यवहार करत आहे.

## हदगावमध्ये साडेचार लाखांची बॅग लंपास; अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** हदगाव येथील एसबीआय बँक शाखेत पैसे भरण्यासाठी गेलेल्या एका शेतकऱ्याचे ४ लाख ५० हजार रुपये अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले. ही घटना दि. १७ फेब्रुवारी रोजी दुपारी बाराच्या सुमारास एसबीआय बँकेतच घडली.

हदगाव तालुक्यातील पेवा येथील शेतकरी प्रताप प्रभाकर जाधव (३६) हे दि. १७ फेब्रुवारी रोजी एसबीआय बँक शाखा हदगाव येथे शेती मालाचे आलेले ४ लाख ५० हजार रुपये बॅगमध्ये घेवून बँकेच्या रांगेत बसलेले होते. भरलेली बँकेची पावती चुकल्याने पैशांची बॅग बसल्या ठिकाणी ठेवून दुसरी पावती घेण्यासाठी गेले एवढ्यातच कोणी तरी चोरट्यांनी ती ४ लाख ५० हजार रुपयांची बॅग चोरून नेली. याप्रकरणी प्रताप जाधव यांच्या फिर्यादीवरून हदगाव पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केली आहे. तपास पोलीस उपनिरिक्षक रायबोळे करत आहेत.

**मुखेड तालुक्यातील नंदगाव येथे घरफोडी**

मुखेड तालुक्यातील नंदगाव (प.क.) येथील छत्रपती उर्फ तिरुपती तांबोळी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेदरम्यान नंदगाव (प.क.) ता. मुखेड येथील त्यांचे बंद घराचे कुलूप फोडून चोरट्यांनी डब्यात ठेवलेले सोन्या-चांदीचे दागिणे आणि रोख रक्कम असा एकूण ५८ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. छत्रपती तांबोळी याच्या फिर्यादीवरून मुखेड पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार तेलंगे करत आहेत.

## हर्षवर्धन जाधव यांची तुरुंगात रवानगी

**नागपूर (प्रतिनिधी)–** माजी आ. हर्षवर्धन जाधव यांनी न्यायालयाचे निर्देशानंतर आज मेयो रुग्णलयातून प्रकृतीची खातरजमा करत कारागृहात रवानगी करण्यात आलीय आहे. नागपूर पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर हर्षवर्धन जाधव यांनी छातीत वेदना होत असल्याची तक्रार केल्यानंतर त्यांना डॉक्टरांनी २४ तास अंडर ऑब्झर्वेशनमध्ये ठेवले होते. २०१४ साली सरकारी कामात अडथळा आणण्याच्या प्रकरणात हर्षवर्धन जाधव यांच्याविरुद्ध अनेक वॉरंट निघूनही ते न्यायालयात हजर होत नव्हते. त्यामुळे न्यायालयाच्या निर्देशानुसार त्यांच्या विरोधात नॉन बेलेबल वॉरंट काढण्यात आले होते.






जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# छत्रपती शिवाजी महाराज : काल, आज आणि उद्या

छत्रपती शिवाजी महाराज हे भारताच्या इतिहासातील तेजस्वी व्यक्तिमत्त्व असून, त्यांचे जीवन आणि कार्य प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे. १६३० मध्ये शिवनेरी गडावर जन्मलेले शिवाजी महाराज हे फक्त एक पराक्रमी योद्धाच नव्हते तर एक कुशल प्रशासक, आदर्श राजा आणि समाजातील सर्व घटकांचा सन्मान करणारे शासक होते. त्यांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्याने महाराष्ट्राला अभिमानाचे स्थान मिळवून दिले आहे. शिवाजी महाराजांचे बालपण त्यांच्या आई जिजाबाईंच्या छत्रछायेखाली राष्ट्रभक्ती आणि धार्मिकतेच्या संस्कारांनी घडले. लहान वयातच त्यांनी राज्य स्थापनेची महत्त्वाकांक्षा बाळगली आणि त्यासाठी त्यांनी स्वराज्य स्थापनेची नीव रोवली. महाराजांनी अफझलखानाचा वध, शाईस्तेखानावर धाडसी हल्ला आणि आग्र्याच्या कैदेतून सुटका अशा अनेक थरारक घटनांमधून आपल्या बुद्धीमत्तेचे दर्शन घडवले. त्यांची प्रशासन पद्धती लोकाभिमुख होती. त्यांनी गड किल्ल्यांवर मजबूत व्यवस्थापन ठेवून ते स्वराज्यासाठी सुरक्षित ठेवले. लोककल्याणकारी योजना, शेतकऱ्यांसाठी दिलासा, महिलांचा सन्मान आणि धार्मिक सहिष्णुता हे त्यांच्या राज्यकारभाराचे प्रमुख वैशिष्ट्य होते. शिवाजी महाराजांचे विचार आजच्या काळातही तितकेच उपयुक्त आहेत. भ्रष्टाचार, सामाजिक भेदभाव आणि देशातील आंतरिक अस्थिरता यांसारख्या समस्यांशी लढा देण्यासाठी शिवाजी महाराजांच्या धैर्य, सत्यनिष्ठा आणि लोककल्याणाच्या विचारांची आवश्यकता आहे. त्यांची नेतृत्वशैली आजच्या तरुणांनी आत्मसात करावी अशी आहे. त्यांनी कधीच अन्याय सहन केला नाही आणि आपल्या भूमिचा प्रत्येक इंच स्वराज्यासाठी समर्पित केला. आज देशात नेतृत्वात पारदर्शकता, लोकाभिमुख निर्णय आणि देशासाठी निस्वार्थ वृत्तीची गरज आहे. भारतीय संस्कृती ही विविधतेने नटलेली आहे. मात्र आधुनिकीकरणाच्या नावे आपण आपल्या परंपरांना विसरत चाललो आहोत. शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यात धर्मनिरपेक्षता आणि भारतीय संस्कृतीचा सन्मान कायम ठेवला होता. त्यांनी मुघल आणि पोर्तुगीजांच्या आक्रमणातही हिंदू संस्कृतीचे जतन केले. आज जागतिकीकरणाच्या काळात भारतीय भाषांचा, कला प्रकारांचा, तसेच पारंपरिक जीवनशैलीचा सन्मान राखणे महत्त्वाचे आहे. युवापिढीने आपल्या परंपरांची जाणीव ठेवून जगाशी स्पर्धा करणे गरजेचे आहे. शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या संरक्षणासाठी भक्कम गड आणि किल्ल्यांची उभारणी केली. आज हे गड-किल्ले आपल्यासाठी केवळ ऐतिहासिक वारसा नसून ते आपली संस्कृती आणि गौरवशाली इतिहासाचे प्रतीक आहेत. मात्र सध्या या गडांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. अनास्था, पर्यटकांचा अतिरेक आणि प्रशासनाचा ढिसाळपणा यामुळे गड-किल्ल्यांचे जतन होत नाही. सरकार आणि स्थानिक प्रशासनाने गडांचे संवर्धन, स्वच्छता आणि पर्यटनासाठी आवश्यक सुविधा पुरवण्याचे ठोस उपाय योजले पाहिजेत. शिवप्रेमींनी देखील गड-किल्ल्यांवर स्वच्छता मोहिमा राबवून योगदान द्यायला हवे. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण देशाचे अभिमान आहेत. त्यांचे विचार, कार्य आणि नेतृत्वशैली आजच्या काळात देखील आपल्याला मार्गदर्शन करणारी आहेत. त्यांच्या विचारांवर आधारित एक प्रगत, सशक्त आणि सुसंस्कृत समाज निर्माण करण्याची जबाबदारी आपली आहे. महाराजांच्या वारशाचे संवर्धन हे केवळ इतिहास जतन करण्यासाठी नव्हे, तर प्रेरणा घेण्यासाठी आवश्यक आहे.

# छत्रपती शिवरायांची न्यायव्यवस्था रयतेसाठी न्यायपूर्ण



छत्रपती शिवरायांचे राज्य हे न्यायनिष्ठ लोक कल्याणकारी स्वराज्य होते. न्याय ही संकल्पना आजच्या कायदेविषयक अभ्यासात आधुनिक किंवा पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाच्या प्रभावाने अभ्यासली जाते, परंतु जेव्हा आम्ही भारतीय इतिहासाचा आढावा घेतो त्यावेळेस छत्रपती शिवरायांची न्यायविषयक जाणीव किती प्रगल्भ होती याची प्रचिती त्यांच्या राज्याभिषेक सोहळा प्रसंगावरून येते. छत्रपती शिवरायांच्या राज्याभिषेक प्रसंगी उपस्थित असलेले इंग्रज प्रतिनिधी हेन्री ऑक्झिडेन यांच्या नोंदीप्रमाणे छत्रपती शिवरायांची न्यायविषयक दृष्टिकोनाची साक्ष देताना ते म्हणतात, छत्रपती शिवरायांच्या सिंहासनाच्या दोन्ही बाजूस सुवर्णांकित भाल्याच्या टोकावर अनेक अधिकारदर्शक व राजसत्तेची चिन्हे असलेली आम्ही पाहिले. उजव्या हाताला दोन मोठ्या दाताच्या मत्स्याची सुवर्णांची शिरे होती. डाव्या हाताला अनेक अश्वपुष्पे व एका मूल्यवान भाताच्या टोकावर समपातळीत लोंबणारी सोन्याच्या तराजूची पारडी न्याय चिन्ह म्हणून तळपत होती. समतोल तराजू म्हणजे अर्थात नि:पक्षपाती न्यायव्यवस्थेचे प्रतीक आहे. आज या समतोल पातळीवरील तराजूस भारतासह जगभरात नि:पक्षपाती न्यायव्यवस्थेचे चिन्ह म्हणून मान्यता मिळालेली दिसून येते.

छत्रपती शिवरायांची न्यायव्यवस्था रयतेसाठी अतिशय प्रामाणिक आणि न्यायपूर्ण होती. त्यांच्या राज्यात प्रत्येक नागरिकाला न्याय मिळावा यासाठी एक स्पष्ट प्रणाली शिवरायांनी निर्माण केली होती. छत्रपती शिवरायांनी न्यायाच्या पद्धतीत सामान्य लोकांना न्याय मिळवून दिला आणि समाजातील विविध समस्या सोडवण्यास मदत केली. एखाद्या गरीब शेतकऱ्यांचे शोषण झाले असेल तरीही त्यांनी शोषकाविरुद्ध शेतकऱ्यास न्याय मिळाला पाहिजे याची काळजी घेतली. छत्रपती शिवरायांच्या न्यायव्यवस्थेची प्रमुख तत्वे पुढीलप्रमाणे आहेत.

१)आपत्तीग्रस्त कुटुंबांना मदत. २ प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार. छत्रपती शिवरायांच्या राज्यकारभारात धर्म, न्याय, लोकांची भलाई या गोष्टींना प्राधान्य देण्यात आले होते. त्याचबरोबर छत्रपती शिवरायांच्या शासनव्यवस्थेत सत्ता विकेंद्रीकरणाला खूप महत्त्व होते. राजेशाही शासन व्यवस्था असूनसुद्धा छत्रपती शिवरायांनी सत्ता विकेंद्रीकरणाला प्राधान्य देऊन समाजात सामाजिक संतुलन राखण्याचा उल्लेखनीय प्रयत्न केल्याचे आढळून येते. छत्रपतींचे शासन हे न्यायनिष्ठ, लोककल्याणकारी स्वरूपाच्या व्यवस्थेचे एक आदर्श उदाहरण आहे.

भारताच्या इतिहासाकडे वळून पाहता भारतीय इतिहासात होऊन गेलेल्या अनेक प्रशासकापैकी छत्रपती शिवरायांनी निर्माण केलेली प्रशासकीय न्यायदान व्यवस्था उल्लेखनीय आहे. शिवराय एक प्रजाहितदक्ष राज्यकर्ते होते. राजकीय सत्तेचा वापर प्रजेच्या कल्याणासाठी करावयाचा असा आदर्श त्यांच्या डोळ्यासमोर होता. संपूर्ण प्रजा अन्यायमुक्त व सुरक्षित बनली पाहिजे, परस्पर विरोध करून सर्वांचाच विनाश होण्यापेक्षा नीतीवान व सदाचारी बनली पाहिजे असे त्यांचे स्पष्ट म्हणत होते. छत्रपती शिवरायांना आपल्या स्वराज्यातील सर्वांनी आदर्श नीति मूल्यांचे पालन करावे असे वाटत असे.

छत्रपती शिवरायांनी आपल्या राज्यातील प्रजेवर कोणत्याही स्वरूपाचा व कोणाकडूनही अन्याय झालेला मान्य नव्हता अन्यायग्रस्त व्यक्तीस तात्काळ चौकशी करून न्याय मिळाला पाहिजे ही त्यांची मूळ भावना होती. न्यायदानात विलंब म्हणजे न्याय नाकारणे होय justice delayed is justice denied हे आधुनिक लोकशाही काळात मानले जाणारे तत्व छत्रपती शिवरायांनी आपल्या वेळीही समजून घेतले होते, म्हणून न्यायदानाचे कार्यविना विलंब झाले पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता. त्याचबरोबर न्यायदानाचे कार्य हे पवित्र कार्य असून त्यांनी नि:पक्ष पातीपने चालले पाहिजे हा त्यांचा काटेकोर नियमच होता. न्याय मागण्यास येणारा कोणीही असला तरी त्याचा धर्म, पंथ, जात किंवा समाजातील स्थान, व्यवसाय इत्यादी कशाचाही विचार न करता त्याचे म्हणणे ऐकून व त्यातील सत्य/असत्यता पडताळून आदर्श विचारांच्या आधारावर त्यास न्याय दिला पाहिजे व अन्याय करणाऱ्यास शिक्षा दिली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. न्यायदानाच्या वेळी अन्याय करणारी व्यक्ती कितीही प्रतिष्ठित असली तरी त्याचबरोबर नातेवाईक असली तरी छत्रपती शिवरायांनी त्याची कधीही गय केली नाही. छत्रपती शिवरायांच्या न्यायव्यवस्थेत दिवाणी व फौजदारी या दोन्ही स्वरूपाच्या विवादात निर्णय देताना स्थानिक न्यायालयाचे निर्णय विशेष महत्त्वाचे मानलेली दिसून येतात. कारण विवादाचे मूळ कारण व चूक अन्याय करणारी व अन्याय सहन करणारा हा वादी प्रतिवादी स्थानिक लोकांना माहीत असतो, अशी त्यांची धारणा होती म्हणून त्यांचे न्याय निर्णय अधिक वास्तववादी व वंदनीय ठरलेले दिसून येतात.

फौजदारी स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये कडक शासन करून प्रजेमध्ये शांतता व सुव्यवस्था तसेच सदाचार वाढीस लावण्याचे प्रयत्न छत्रपती शिवरायांनी केल्याचे दिसून येतात. छत्रपती शिवरायांच्या केंद्रीय न्यायव्यवस्थेत राजमंडळ नावाची सभा न्यायदान करण्याचे कार्य करीत असे. या सभेत उच्च अधिकाऱ्यांचा समावेश होता. यात स्वतः राजाचे मंत्री, सरदेश अधिकारी किंवा सुभेदार, हवालदार, मुजुमदार, सरदेशमुख, देशमुख, देशपांडे, कुलकर्णी, पाटील व ज्या भागातील ही फिर्याद आहे त्या भागातील महाजन या वतीनी अधिकाऱ्याचा समावेश असे. यात संबंधित घटनेतील दोन्ही बाजू ऐकून साक्षी पुरावे नोंदवले जात त्यावरून या मंडळाचा निर्णय राजाकडे पाठवला जाईल. त्यास राजाची मान्यता मिळाल्यानंतर त्यावर राजमुद्रा झाल्यावर तो निवाडा अंतिम मानला जात असे. सुभाराजमंडळ, फरगणा, राजमंडळतर्फे किंवा ठाणे राजमंडळ व सर्वात कनिष्ठ पातळीवर असलेला गाव राजमंडळ किंवा ग्राममजलीस अशी राजकीय किंवा सरकारी न्यायालयाची शिवरायांच्या कालखंडात रचना होती. ग्रामसभा, गोत्रमजलीस ही शिवकालीन न्यायव्यवस्थेत सर्वात कनिष्ठ असलेली न्याय व्यवस्था होती. या सभेला विशेष महत्त्व होते. कारण कोणत्याही प्रकारच्या वादात स्थानिक अधिकारी व व्यक्तींना अधिक विश्वासपूर्ण माहिती असते असे छत्रपती शिवरायांना वाटत असे. गाव प्रमुख व ग्रामपंचायतीचा निर्णय अमान्य झाल्यास ग्रामसभा भरवली जात असे.


शिवकालीन न्यायदान प्रक्रिया जेव्हा आम्ही लक्षात घेतो तेव्हा यांनी प्रक्रियेत पुढील टप्पे आढळून येतात- १)न्याय मागणाऱ्या फिर्यादीकडून तक्रार स्वीकारणे .

२) प्रतिवादीकडून त्याच्या बचावार्थ पुरावे मिळवणे. ३) पुरावे संपादन करणे. ४) न्यायीक निर्णय अथवा निवाडा करणे.

शिक्षा देताना छत्रपती शिवरायांच्या न्यायव्यवस्थेत वेगवेगळ्या शिक्षा पद्धती अंमलात आणलेल्या होत्या. ज्यामध्ये वतन जप्त करणे, आर्थिक दंड करणे, हातपाय मोडणे, डोळे काढणे, कडेलोट करणे इत्यादी. नि:पक्ष न्यायव्यवस्था कायद्याची रचना यातून छत्रपती शिवरायांची दूरदृष्टी दिसून येते. स्वराज्याचा स्वतंत्र कायदा होता अष्टप्रधान मंडळातील प्रत्येक सदस्याचे अधिकार, कर्तव्य यामध्ये विशद करण्यात आले होते. थोडक्यात छत्रपती शिवरायांच्या राज्यकारभाराला लिखित राज्यघटनेचा आधार होता. छत्रपती शिवरायांनी स्वराज्यात मानवी हक्काचे रक्षण आणि समाजातील प्रत्येक घटकाच्या हिताची काळजी घेतली. अशा या वंदनीय, पूजनीय, आराध्य देवतेच्या जयंतीनिमित्त मानाचा मुजरा!

-डॉ. सत्यभामा जाधव
उपाध्यक्ष, जिजाऊ ब्रिगेड नांदेड
मो. ९४०३७४४७१५

# समतेचे पुजारी : राजा शिवछत्रपती



सामाजिक समता प्रस्थापित करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज या महानायकाचा जन्म जिजाऊ माँसाहेब व शहाजीराजे भोसले यांच्या पोटी १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर तर देहावसान हे ३ एप्रिल १६८० रोजी रायगड किल्ल्यावर झाले. त्यांचे जास्तीचे आयुष्य अनेक किल्ल्यावर व्यतीत झाले. अनेक मोहिमा यशस्वी करण्यात त्यांचा पराक्रम व मुत्सद्दीपणा कामी आला. आव्हानांनी भरलेल्या आयुष्यात, स्वकर्तृत्वाने स्वराज्याची स्थापना केली. त्यात बालपणापासून ते मरेपर्यंत सर्व जाती-धर्माचा समूह शिवरायांसोबत होता. रायरेश्वराच्या मंदिरातील सर्व जाती-धर्माच्या बाल सवंगड्याच्या सोबत घेतलेल्या स्वराज्य स्थापनेची शपथ सर्व मावळ्यांसोबत घेऊन लोककल्याणाचा विचाराने छत्रपती शिवरायांनी राज्यकारभार केला.

माँ जिजाऊंनी बाळ शिवबावर उत्तम संस्कार करून त्यांचे योग्य संगोपन केले. म्हणूनच हे उत्तुंग व्यक्तिमत्व घडले. माँ जिजाऊच शिवबांच्या 'गुरु'ठरल्या आहेत. पुण्यात पाषाण आणि जिजापूर या नावाच्या 'पेठा' वसवून जहागिरीची व्यवस्था नीटपणे लावून दोन वर्षे शिवबा कर्नाटकात बेंगलोरमध्ये वडील स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले सोबत राहून पराक्रम, युद्ध प्रसंगीची बुद्धिमत्ता, उत्तम प्रशासन व स्वतंत्र राज्यकारभार या मूलभूत कौशल्याचे शिक्षण देऊन आपल्या खाजगी जहागिरीतून हत्ती, घोडे, सैनिक, कारकून, हुजरे, पैसे, जडजवाहीर, भगवा झेंडा, राजमुद्रा अशा स्वतंत्र राज्यकारभारासाठीच्या बाबी शहाजीराजेनी शिवाजीराजेंना दिल्या. स्वराज्य संकल्पिका माँ जिजाऊंच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात शिवबांनी तर तामिळनाडूतील तंजावर येथे शिवबाचे सावत्र बंधू व्यंकोजीराजे यांनी स्वराज्य प्रत्यक्षात आणले.

शिवबांनी बालपणी युद्धशास्त्रात निपुण असणाऱ्या आपल्या ज्येष्ठ बंधू संभाजीराजेंकडून युद्धशास्त्राचे धडे घेतले. त्याचं आपल्या भावाचे नाव आपल्या आपत्यास दिले, ते दुसरे 'छत्रपती' झाले. स्वराज्य स्थापनेस अनेक मातब्बर परिवारातील लोकांची मदत मिळावी या हेतूने- सईबाई, सोयराबाई,सगुनाबाई, पुतळाबाई, लक्ष्मीबाई, सकवारबाई, काशीबाई, गुणवंताबाई या आठ बायका केल्या. सर्वांवर सारखे प्रेम केले. शिवरायांनी स्वराज्यातीलच नव्हे तर परकीय राजवटीतील स्त्रियांचाही सन्मान केला.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करून रयतेचे स्वराज्य शिवबाने निर्माण केले. शिवरायांवर अनेक संकटे चालून आलीत. अफजलखान, शाहिस्तेखान, दिलेरखान, सिद्धी जोहार, औरंगजेब अशा असंख्य शत्रूंचे महाराजांनी मोठ्या धैर्याने मुकाबला केला.अशक्य ते शक्य करून दाखविले. राज्यकारभाराची पूर्ण कला अवगत असणारा शिवराय अद्वितीय सेनानी होते. शिवरायात मुत्सद्दीपणा बरोबरच व्यवस्थापन कौशल्याची तंत्र अवगत केलेली होती. सुरतेची मोहीम, आग्रा मोहीम, राज्याभिषेक, अफजलखान प्रकरण, पुरंदरचा तह, उंबरखिंडीची लढाई, सिंहगड मोहीम, किल्ल्याचे व्यवस्थापन, पन्हाळगडचा वेढा व त्यातून सुटका हा त्यांच्या व्यवस्थापन कौशल्याचा उत्तम नमुना पाहाव्यास मिळतो. शिवरायांनी स्वराज्याची स्थापना केल्यानंतर त्यांच्यात सुसूत्रता आणण्यासाठी अष्टप्रधान मंडळ निर्माण केले. नियम करून प्रत्येकाला स्वतंत्र खाते दिले. सर्वांवर छत्रपतीचे नियंत्रण होते.

स्वराज्याचा कारभार पाहताना शिवरायांनी सर्वांना समानतेने वागविले. जात व धर्माच्या आधारावर कोणाला विशेष सवलती दिल्या नाहीत किंवा याच आधाराने कुणाला आपल्या अधिकारापासून वंचितही ठेवले नाही. स्वराज्याची उभारणी करताना कोणतेही अभिनिवेश वा पूर्वग्रह मनात न ठेवता आपल्या विवेकाला प्राधान्य दिले होते. राज्यकारभारात धर्माचे अहवाजवी प्रस्थ वाढू दिले नाही. धर्मापेक्षा स्वराज्य मोठे हे तत्व त्यांनी स्वीकारले होते. शिवरायांनी एका पत्रात लिहिले, 'ऐशा चाकरास ठिकठाक केले पाहिजे, ब्राह्मण म्हणून कोण मुलांहिजा करू पाहतो? या उपरी बोभाटा आलिया उपरी तुमचा मुलाहिजा करणार नाही.'अशी तंबी नोकरांना दिली.

शिवरायांच्या जीवनात सकारात्मक प्रयत्नावादी अर्थातच विज्ञानवादी दृष्टिकोन प्रकर्षाने आपणास जाणवते. स्वतःचा मुलगा 'राजाराम' पालथा जन्माला आल्यावर ज्योतिषाने अपशकून घडले हे सांगितले, तेव्हा शिवाजीराजे म्हणाले,'ज्या अर्थी माझा मुलगा पालथा जन्माला आला, त्याअर्थी तो दिल्लीची पातशाही पालथी घालीन'. शिवरायांनी युद्धप्रसंगी कोणताही मुहूर्त पाहिला नाही. किल्ल्याला स्वतःचे किंवा कुटुंबीयाचे नाव दिले नाही किंवा कोणती पूजा केली नाही. शिवरायांसाठी घाम गाळणारे, लढणारे, प्रसंगी मृत्यूला आनंदाने स्वीकारणारे असंख्य मावळे सर्वच समाजातून पुढे आले होते. शिवाजीराजे समतावादी होते, कधी भेदाभेद करणारे नव्हते,त्यांच्यात आप-पर-भाव नव्हता. 'नागनाक' (महाराला) पाटील केले. रामोशी समाजातील बहिर्जीला गुप्तहेर खात्याचा प्रमुख बनविले. हंबीरराव मोहितेला सरसेनापती केले. जिवाजी महाले या (नाभिक) अंगरक्षक केले. महार जातीच्या लढाऊवृत्तीचा व इमानदारीचा स्वराज्यसाठी उपयोग करून घेतला. शिवरायांच्या निवडपत्रात महारांचा 'भूमिपुत्र' असा उल्लेख केला आहे. माळी, धनगर, मातंग, महार, कोळी, आगरी, शेणवी, मुसलमान, शेतकरी, स्त्रिया, तरुण, वृध्द, बालके, व्यापारी या सर्वांना शिवरायांनी हक्क अधिकार दिले. स्वराज्य निर्मिती व उन्नतीसाठी सर्व जाती धर्माच्या लोकांनी तन, मन, धन अर्पण केल्याचे असंख्य दाखले इतिहासात मिळतात. त्यात कान्होजी जेथे, तानाजी मालुसरे, येसाजी कंक, नेताजी पालकर, हंबीरराव मोहिते, (मराठा), मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो (ब्राह्मण), बाळाजी आवजी, बाजीप्रभू देशपांडे (कायस्थ), शिवाजी काशीद, तान महाला(न्हावी), लय पाटील (कोळी), नूर बेग, काझी हैदर, मदारी मेहतर, दौलतखान, वाहतखान, सुलतानखान आणि सिद्धी इब्राहिम (मुसलमान) या सर्वांसह असंख्यजन स्वामीभक्त सेवक होते. या अठरापगड जातीच्या माणसामुळे स्वराज्याचा संकल्प पूर्ण झाला.

शिवरायांनी आपल्या सैनेतील मुस्लिम सैनिक आणि सरदारांसाठी मस्जिद बांधली. कुराणाचा आदर केला. हिंदू धर्मातील संताबरोबरच मुस्लीम धर्मातील संताना निवृत्तीवेतने दिले. बैरागी, साधू, अवलीयांना आपल्या खर्चाने 'मठ' बांधून दिले. त्यांचा उदरनिर्वाहासाठी व्यवस्था केली. मस्जिदीबरोबरच पीर, मंदिराच्या दिवाबत्तीची नैवेद्याची व्यवस्था जमिनी इनाम देऊन त्यांच्या निर्वाहाची व्यवस्था शासकीय खर्चातून केली. शिवरायांची लढाई आदिलशहा, मुगल-शहा, सिद्धी, पोर्तुगीज यांच्याविरुद्ध होती पण धार्मिक नव्हती. राजकीय लढाई होती. शिवरायांच्या सैन्यात ३५% सैन्य मुस्लिमांचे होते. त्यांच्या २७ संरक्षकांपैकी १० अंगरक्षक मुस्लिम होते. त्यांचे पहिले चित्र रेखाटणारा मीर मोहम्मद हा मुस्लिमच होता. आरमारा दलाचे प्रमुख दर्या सारंग व दौलखान हे मुस्लिमच होते.असे असंख्य मुस्लिम शिवरायाकडे होते. म्हणजेच छ. शिवराय धर्मनिरपेक्ष म्हणजेच मानवतावादी समतेचे महान पुजारी होते हे दिसून येते. आज देशभर जातीवादी विचारांचा स्तोम माजविणाऱ्या मंडळींनी छ. शिवरायांच्या ३९५ व्या जयंतीच्या निमित्ताने पुन्हा पुन्हा वाचन, मनन, चिंतन करून त्यांचे अनुसरण करणे गरजेचे वाटते.

-पंडित पवळे,
नांदेड
मो. ९८९०२३२९६२

# ग्रामोध्दाराचे महामेरू : मराठाभूषण माधवराव पाटील शेळगावकर

लहरों को साहील की दरकार नहीं होती, हौसला बुलंद हो तो कोई दीवार नही होती; जलते हुये चिरागने अंधियो से ये कहा, उजाला देने वालो की कभी हार नहीं होती..!!

जो इतरांच्या सुखासाठी झटतो तो आपोआपच सुखी होतो. जो इतरांना निर्व्यसनी राहण्याची प्रेरणा देतो, त्याला स्वतः निर्व्यसनी रहावेच लागते. जो दुसऱ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देतो, तो आपसूकच अंतर्बाह्य निर्मळ होत जातो. दुसऱ्यांना मोठं करण्यासाठी आधी स्वतःचं मन मोठं करावं लागतं. कोत्या मनाची माणसं दीर्घकाळ वलयांकित होऊ शकत नाहीत. हा सृष्टीचा नियम आहे. जमीन और मुकद्दर की एक ही फितरत है, जो बोया वह निकलना तय है!



सामान्य माणसाच्या जीवनात स्वच्छतेचा, आरोग्याचा, शिक्षणाचा, सद्गुणांचा, सुसंस्कारांचा, समाधानाचा आणि निखळ आनंदाचा प्रकाश पडावा यासाठी उभी हयात वेचणारे अनेक कर्मयोगी माझ्या जीवनात मार्गदर्शक म्हणून मला लाभले. न्या. भीमराव नरवाडे पाटील, युगपुरुष पुरुषोत्तम खेडेकर, डॉ. आ. ह. साळुंखे, स्मृतिशेष गोपाळराव पोहरे, प्रा. मा. म. देशमुख, माधवराव पाटील शेळगावकर, अरुण तावरे, शिवा बिरकले इत्यादी हितचिंतकांच्या सहवासात मला राहता आलं हे मी माझं भाग्य समजतो.

परममित्र प्राचार्य संजय पाटील शेळगावकर यांचे वडील म्हणून माझ्या आयुष्यात चंचुप्रवेश घेतलेले माधवराव पाटील शेळगावकर काका एक अफलातून व्यक्तीमत्व. शेतकरी संघटनेतील ज्येष्ठ नेते ते स्वच्छतादूत हा त्यांचा थक्क करणारा प्रवास मी अनेकदा जवळून अनुभवलाय. व्याख्यानाच्या निमित्ताने शेळगावकर काकांसोबत एका गाडीत प्रवास करणं हा अनुभव एखाद्या हाय प्रोफाईल केडर कॅम्पच्या तोडीस तोड असतो. अनुभवाची शिदोरी, जनसामान्यांविषयी असलेली निस्वार्थी तळमळ आणि अवघे विश्व व्यापून टाकणारा दुर्दम्य आत्मविश्वास ही शेळगावकर काकांची बलस्थाने! माझ्या आणि त्यांच्या वयात तब्बल एका पिढीचं अंतर, पण शेळगावकर काकांसारख्यांना मैत्री करताना कधी वय, जात, धर्म, आर्थिक किंवा शैक्षणिक तफावत, इत्यादी क्षुल्लक बाबी कधी अडसर ठरू शकत नाहीत. सकाळपासून संध्याकाळपर्यंत शेळगावकर काका कुणाकुणाला भेटले या यादीवर नजर टाकली की कळतं ही व्यक्ती किती सर्वदूर पसरली आहे. न्यायाधीश, वकील, डॉक्टर, अधिकारी, युवक, विद्यार्थी, साहित्यिक, प्रकाशक, लेखक, समाजकारणी, कलावंत, राजकारणी, उद्योजक, व्यावसायिक, अशा बहुक्षेत्रीय दिग्गजांची मांदियाळी ज्यांच्या फ्रेंडसर्कलमध्ये समाविष्ट असेल, तो व्यक्ती असाधारण नक्कीच नसतो. मराठा सेवा संघाच्या नांदेड शाखेमार्फत माधवराव पाटील शेळगावकर काकांना आंतरराष्ट्रीय शिव-जन्मोत्सवानिमित्त आयोजित सोहळ्यात मराठाभूषण पुरस्कार २०२५ सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. त्यानिमित्त काकांचे हार्दिक अभिनंदन व दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि उत्तुंग यशाच्या मनभरुन व भरभरुन सदिच्छा.! काही पुरस्कार माणसांची उंची वाढवितात तर काही माणसं पुरस्काराची उंची गगनचुंबी करतात. शेळगावकर काकांसारख्या व्यक्तीची मराठाभूषण पुरस्कारासाठी निवड करणाऱ्या मराठा सेवा संघाच्या रत्नपारखी टिमचेही यासाठीच कौतुक करावे तितके थोडेच आहे.

मुलगा, बाप, पती, सासरा, काका, मामा, आजोबा, मित्र इत्यादी मानवीय नात्याला समन्याय देणाऱ्या कुटुंबवत्सल शेळगावकर काकांकडून असंख्य गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. क्रांतिपुरुष ॲड. पुरुषोत्तम खेडेकर यांच्या अमृतमहोत्सवी सोहळ्यात काकांचे भाषण अजूनही आम्हा सर्वांच्या स्मरणात आहे. बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले... जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या उक्तीनुसार शेळगावकर काकांनी पद किंवा पैशापेक्षाही कार्यकर्तृत्वाने राज्यभर स्वकष्टार्जित आदर व सन्मान मिळविला. बुद्ध साहित्यावर आधारित ओशोंच्या एका हिंदी पुस्तकात आपण सर्वांनी वाचलंय की, लोग कहते हैं की गुरु का आदर करना चाहिए. मगर मै कहता हूं, जिसका आदर करना ही पडे वहीं गुरु कहलाने योग्य है। आदर कभी थौपा नहीं जाता और सम्मान की कभी मांगकर नहीं मिलता.

प्रेजिंग इज ए डिव्हाइन क्वालिटी. कौतुक करणारी तोंडं हल्ली शोधावी लागतात, टीका करणारे पावलापावलावर हटकून भेटतात. कौतुक कसं करावं? हे शिकावं अशा मोजक्या व्यक्तीमत्त्वात शेळगावकर काकांना मी न्या. भीमराव नरवाडे पाटील, क्रांतिपुरुष पुरुषोत्तम खेडेकर, अनिल उर्फ एकनाथ मोरे यांच्यासोबत नेहमीच अग्रस्थानी ठेवेल. जे जे चांगलं दिसतंय त्यावर भरभरुन बोललं, त्याविषयी संधी मिळेल तिथे व्यक्त झालं तर हुरुप वाढतो आणि ती व्यक्ती अधिक जबाबदारीने मोठं काम करायला सज्ज होते. स्तुतीसुमने उधळणे वेगळे आणि हृदयापासून, कुठलाही स्वार्थ न ठेवता, परतफेडीची अपेक्षा न ठेवता वास्तवकथन करणं वेगळं. शेळगावकर काका माझ्या दृष्टीने दुसऱ्या श्रेणीतील हितचिंतक आहेत. त्यांच्या ह्याच सकारात्मक वृत्तीमुळे या वयातही त्यांचा उत्साह, उमेद व उर्जा दृष्ट लागण्याजोगी यौवनातच आहे. लहजे को जरा देख, जवाँन है की नही; बालोंकी सफैदी को अण्णा बुढापा नहीं मानते.! अत्यंत हळव्या मनाच्या काकांनी पुत्रवियोगाचे दुःख देखील हसतहसतच पचवले. त्यांच्या कपाळावर कधी आठी नाही बघितली, ठेवणीतलं स्मितहास्य धारण करून अतिशय प्रसन्न मुद्रेने त्यांची एंन्ट्री झाली की वातावरणात नवचैतन्य पसरतं.

माधवराव पाटील शेळगावकर हे एक एकत्र कुटुंब पद्धतीचा पुरस्कार करणारे अत्यंत कुटुंबवत्सल व्यक्तिमत्त्व म्हणून सर्वदूर सुपरिचित आहेत.

सौ. सुलोचनाबाई आणि सौ. चंद्रकलाबाई अशा दोन धर्मपत्नींसमवेतच्या सुखी सहजीवनात आपल्या सर्व अपत्यांना उच्च विद्याविभूषित केलं. त्यांच्या कुटुंबात आज दोन डॉक्टर, सहा इंजिनियर, प्राचार्य, प्राध्यापक असा परिवार त्यांनी घडविला. एवढंच नाही तर सुनांवर लेकीगत माया करणाऱ्या शेळगावकर काकांनी त्यांच्या सूनबाई सौ. सरोज संजय पाटील यांना जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत संधी देऊन जिल्हा परिषदेत सभापती म्हणून काम करण्याची संधी दिली. त्यांचे चिरंजीव प्राचार्य संजय पाटील आज शिक्षण क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत उत्तम कार्य करत आहेत. शेळगावकर काकांची धारणा आहे की जर राष्ट्र प्रगत करायचे असेल तर आधी प्रत्येक कुटुंब प्रगत असणे अत्यंत आवश्यक आहे, आणि हे केवळ भाषणातून व्यक्त करण्यापुरतं न ठेवता सुरुवात आपल्या कुटुंबापासून केली. कल्पक नेतृत्व कौशल्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनाखाली शेळगाव गौरी ग्रामपंचायतीला राज्य व राष्ट्रीय पातळीवरील अनेक पारितोषिके मिळाली. आपल्या गावाचे नाव देशपातळीवर चमकले याचा आनंद त्यांच्या डोळ्यात मी नेहमीच बघत आलोय. आज वयाची साडेसात दशकं ओलांडताना कृतार्थ पालकत्वाचे भाव आणि धिस इज जस्ट बिगिनिंग, दि बेस्ट इज यट टु कम हा आशावाद ही त्यांची माझ्यादृष्टीने बलस्थानं आहेत...

-शिवाजीराजे पाटील बाभळीकर
राष्ट्रीय अध्यक्ष - वीर भगतसिंग
विद्यार्थी परिषद (भारत गणराज्य)
नांदेड

# छत्रपती शिवाजी महाराज हे जगाच्या इतिहासात चरित्रवान राजा -प्रा. डॉ. विश्वाधर देशमुख

**नांदेड (प्रतिनिधी)**– 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले' संत तुकाराम महाराजांच्या या ओळी छत्रपती शिवाजी महाराजांना तंतोतंत लागू पडतात. कारण महाराजांनी खाजगी आणि सार्वजनिक जीवनात कधीच अंतर ठेवला नव्हता. ते जसे बोलत होते तसेच वागत होते. त्यांचे चारित्र्य खाजगी जीवनात जेवढे निर्मळ होते, तेवढेच सार्वजनिक जीवनातही ते निर्मळ होते. म्हणून जगाच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराज हे एक लखलखीत चरित्र संपन्न राजे होऊन गेले, असे मत प्रसिद्ध साहित्यिक तथा लेखक प्रा. डॉ. विश्वाधर देशमुख यांनी व्यक्त केले.



दि. १८ फेब्रुवारी रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिवजन्मोत्सव सोहळा-२०२५' तर्फे विद्यापीठात आयोजित 'शिवरायांसी का आठवावे?' या विषयावरील व्याख्यान प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, कुलसचिव डॉ. डी.डी. पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. हनमंत कंधारकर, प्रा. डॉ. संगीता माकोणे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम.के. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव, नवोपक्रम नवसंशोधन व सहचर्य विभागाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, अधिसभा सदस्य युवराज पाटील, शिवाजी चांदणे, शिवजन्मोत्सव संयोजन समितीचे अध्यक्ष चिंतन हंबर्डे यांची उपस्थिती होती.

पुढे देशमुख म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिवाजी महाराजांचे स्मरण करताना महाराजांची तर्क शक्ती, तीव्र बुद्धी आणि स्वराज्य व्यवस्था इत्यादींचे स्मरण करावे, असे सांगितले आहे. आज शिवाजी महाराजांचे स्मरण करताना रस्त्यांनी बुलेटचे फटाके न उडवता त्यांचा एखादा तरी गुण अंगीकारला तरी ती खरी मावळ्यांची ओळख होईल. यामुळे आजच्या पिढीने किंवा मावळ्यांनी महाराजांचा एक तरी गुण अंगीकारावा, असे आवाहनही यावेळी त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर म्हणाले, ज्या प्रतिकूल परिस्थितीचे रूप महाराजांनी अनुकुल परिस्थितीमध्ये निर्माण केले. महाराजांनी अडचणीमध्ये किंवा समस्यामध्ये लपलेल्या संधीचे सोने केले. हाच गुण विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे. विद्यार्थी दशेत अनेक अडचणींना विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागते, त्या घरगुती, सामाजिक असतील किंवा शैक्षणिक असतील या सर्वावर मात करून त्या अडचणीमध्ये लपलेल्या संधीचे सोने करून आपले ध्येय गाठावे, असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोविंद सूर्यवंशी यांनी केले तर आभार प्रदर्शन अधिसभा सदस्य शिवाजी चांदणे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सतीश हंबर्डे, आकाश मोरे, शंकर शिंगारपुतळे, आदिनाथ डोपेवाड, नीतिक डंक, गंगाधर पुंड, ज्ञानेश्वर कंधारकर, सचिन पवळे इत्यादी विद्यार्थी परिश्रम घेत आहेत.

## दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, सेवालाल महाराजांचा पुतळा उभारणार -आ.भीमराव केराम



**किनवट (प्रतिनिधी)** – तालुक्यातील दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक परवड थांबविण्यासाठी किनवटमध्ये अद्ययावत वसतिगृहाची निर्मिती करणार. सेवालाल महाराजांचा पुतळा उभारणार, असे आश्वासन आ.भीमराव केराम यांनी दिले.

संत सेवालाल महाराज यांची २८६ वी जयंती किनवट येथील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुतळा परिसरात रविवारी दि.१६ साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना ते बोलत होते. व्यासपीठावर माजी खासदार हरीभाऊ राठोड, धरमसिंग राठोड, रामसिंग राठोड, नंदू पवार, सचिन नाईक, प्रशांत राठोड आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी महंत अरुण महाराज यांच्या हस्ते सेवालाल महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करुन भोग लावण्यात आला. याप्रसंगी माजी खा. हरीभाऊ राठोड, धरमसिंग राठोड, सचिन नाईक, कु.निकीता राठोड यांचीही भाषणे झाली. कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, सौ. संध्या राठोड, गंगारेड्डी बैनमवार, नूरसिंग नाईक, उमाकांत कऱ्हाळे, विनोद भरणे, गटशिक्षणाधिकारी शंकर राठोड, सामाजिक कार्यकर्ते श्याम केंद्रे, ॲड. नैतिक नाईक, दिनेश रुणवाल आदींची उपस्थिती होती. सूत्रसंचालन व प्रास्ताविक मुख्याध्यापक मोहन जाधव यांनी केले. नवीन जाधव यांनी आभार मानले.

## थोडक्यात...

### मनीषा बचाटेची महसूल सहायकपदी निवड

**नांदेड (प्रतिनिधी)** – मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर बामणी (ता. लोहा) अल्पभूधारक शेतकरी साईनाथ बचाटे यांची



कन्या मनिषा बचाटे हिची एकाच वेळेस महसूल सहायक व न्यायालयीन लिपिक पदी निवड झाली आहे. मनीषा हिला शिक्षणाची आवड निर्माण करून वडिलांनी शिक्षण क्षेत्रामध्ये करिअर घडवण्यासाठी मार्गदर्शन केले. मनीषाचे प्राथमिक शिक्षण गावातीलच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत तर माध्यमिक शिक्षण राजगडनगर येथील कमला नेहरू शाळेत झाले. सायन्स कॉलेजमधून ती पदवीधर झाली. त्यानंतर तिने स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर तिची एकाच वेळेस महसूल सहायक आणि न्यायालयीने लिपीक पदावर निवड झाली आहे. याबद्दल तिचे सर्वत्र कौतूक होत आहे.

### ऋषिकेश अंमलापूरेची मृद व जलसंधारण अधिकारीपदी निवड

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – नायगाव शहरात राहणाऱ्या रूषिकेश



चंद्रकांत अमलापुरे यांची मृद व जलसंधारण अधिकारी गट (ब) अराजपत्रित पदी निवड झाली आहे. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते त्यांना नुकतेच नियुक्तिपत्र देण्यात आले. रूषिकेशचे प्राथमिक शिक्षण गडगा गावी झाले. माध्यमिक शिक्षण जनता हायस्कूलमध्ये तर नागपूर येथून पदवीचे शिक्षण घेतले. ते सध्या हदगाव येथील जलसंपदा विभागात शासकीय सेवेत कार्यरत होते. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# किनवटच्या बाजारात रानमेवा टेंबरं फळ दाखल

**किनवट (प्रतिनिधी)** – औषधीगुणी असलेला रानमेवा अशी ओळख असलेले टेंबरं नावाचे फळ किनवटच्या बाजारात दाखल झाले आहेत. जेमतेम २० दिवसाचाच हंगाम असलेल्या या रानमेव्याला ग्राहकांची चांगलीच मागणी आहे.



किनवट, मांडवी माहूरसह लगतच्या विदर्भातील खरबीच्या जंगलात बहुविध औषधी वनस्पती व फळांची झाडे आहेत.प्रत्येक फळांचा ठराविक हंगाम असतो. सीताफळ, बोरं, चारं, बीबे, चारोळी अशी अनेक फळं व कंद या जंगलात मोसमानुसार उपलब्ध होतात. विशेष म्हणजे या फळांवर कोणतीही रासायनिक प्रक्रिया नसते. टेंबर हेही फळ औषधीगुणांनी युक्त आहे. या फळाचा हंगाम उन्हाची चाहूल लागताच सुरू होतो. घनदाट जंगलातील पहाडीवर दुर्मीळ असलेल्या टेंबराची झाडे आढळून येतात. पहाडावर या फळाची अनेक झाडे असली, तरी काही ठराविक झाडांनाच फळधारणा होते. कच्ची फळे तोडल्यानंतर ती मोहाच्या पानात, कापसाच्या पऱ्हाटीत अथवा तुराटीत पिकविली जातात. या फळाच्या आत चिक्कुसारखे काळे बी असते. तुरट, गोड अशी चव असलेल्या या बहुगुणी फळाचा हंगाम अत्यंत कमी कालावधीचा आहे. साधारणतः पंधरा ते वीस दिवसाचाच हंगाम असलेल्या या फळाची वर्षभरापासून प्रतीक्षा असते. घनदाट जंगलात हिंस्त्र श्वापदांचे भय असतानाही मोठ्या जोखमीने फळे तोडली जातात. फळासोबतच या झाडाची पानेही उपयोगी आहेत. याच झाडाच्या तेंदू पानांपासून विडी तयार करण्यात येते. टेंबराला हिंदीत तेंदू म्हणून ओळखले जाते. सध्या किनवटच्या बाजारात यवतमाळ जिल्ह्याच्या खरबी जंगलातील टेंबरं दाखल झाली आहेत.१०० ते ८० रुपये प्रतीकिलो असा सध्या टेंबराचा दर आहे. ४ दिवसांपासून टेंबराला चांगली मागणी असल्याची माहिती खरबी येथील विक्रेता प्रमोद खिल्लारे यांनी दिली.

# 'आम्ही असू अभिजात' संमेलनगीताला नांदेडचा संगीत साज!

## आनंदी विकास यांनी संगीतबद्ध केले अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे गीत

**नांदेड (प्रतिनिधी)** – नवी दिल्ली येथे होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे गीत नांदेडच्या सुप्रसिद्ध गायिका, संगीतकार आनंदी विकास यांनी संगीतबद्ध केले आहे. दिग्गज गायकांचा सहभाग असणारे अभिजात मराठीला शब्दबद्ध करणाऱ्या दीर्घ काव्याला त्यांनी संगीताचा साज चढवला असून तमाम नांदेडकरांसाठी ही आनंदाची बाब आहे.

९८ व्या मराठी साहित्य संमेलनासाठी नांदेड मधून एकीकडे शेकडो साहित्यिक रवाना होत आहे. आता नांदेडसाठी आनंदी विकास यांनी संगीतबद्ध केलेले 'आम्ही असू अभिजात' हे संमेलनगीत आणखी एक आनंद वार्ता ठरले आहे.



सोमवारी राज्याचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते या गीताचा शुभारंभ सोहळा पार पडला. यावेळी नांदेडच्या संगीतकार आनंदी विकास यांचाही सत्कार करण्यात आला. पुण्याचे गीतकार डॉ. अमोल देवळेकर यांनी लिहिलेल्या 'आम्ही असू अभिजात', या मराठी भाषेच्या गौरवगीताला संगीताचा साज चढविण्याचे काम त्यांनी केले आहे.

विशेष म्हणजे या गीताचे पार्श्वगायन सुप्रसिद्ध गायक हरिहरन, शंकर महादेवन, मंगेश बोरगावकर, प्रियंका बर्वे, सागर जाधव, शमिमा अख्तार यांनी केले आहे. या गीताचे संगीत संयोजन प्रथमेश कानडे, ध्वनिमुद्रण मन्मथ मठपती, ध्वनि मिश्रण आदित्य देशमुख यांनी केले आहे.

हे गीत संगीत, पार्श्वगायन, लेखन सादरीकरण या सर्वच कसोटीवर आगळे वेगळे सिद्ध होत आहे. या संपूर्ण गाण्याचे चित्रीकरण कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून करण्यात आले आहे.

त्यामुळे या गाण्याचा व्हिडिओ देखील लक्षवेधी ठरला आहे. मराठी भाषेच्या अभिजात दर्जा प्राप्त होण्याच्या घटना क्रमावर आधारित हे गीत असून कवी अमोल देवळेकर यांनी १० अंतऱ्याचे हे दीर्घकाव्य मराठीच्या अभिजात दर्जाचा गौरव करताना लिहिले आहे. संदर्भाचे सुनियोजित सादरीकरण या गीतातून होत आहे.

दरम्यान, आयोजकांनी सोमवारी या गीताचे राज्यपालांच्या हस्ते लोकार्पण करताना संगीतकार आनंदी विकास यांना सन्मानाने या साहित्य संमेलनाला आमंत्रित केले आहे. साहित्यप्रेमी नांदेडकरांसाठी ही अतिशय आनंदाची बाब आहे.



**नवीन नांदेड** – जिल्हा परिषद शिक्षक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित विकास नगर कौठा संस्थेच्या पंचवार्षिक निवडणुकीत विकास पॅनलचे ११, तर प्रगती पॅनलच्या दोन जागा निवडून आल्या. निवडून आलेल्या सदस्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

## नांदेड ते बुध्दगया दररोज रेल्वे सुरु करा -उमाकांत सरोदे यांची मागणी

**अर्धापूर (प्रतिनिधी)** – मराठवाड्यातील जनतेला पवित्रस्थळ असलेल्या बुध्दगया येथे जावून धार्मिक स्थळाचे दर्शन घेण्यासाठी दररोज हुजुरसाहीब नांदेड ते बुध्दगया रेल्वे सेवा तात्काळ सुरु करावी, अशी मागणी माजी नगराध्यक्ष प्रतिनिधी उमाकांत सोनाजी सरोदे यांनी खासदार अशोकराव चव्हाण यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

बुध्दगया हे बौध्द धर्मीयांचे पवित्र तिर्थक्षेत्र आहे. या पवित्र स्थळाचे दर्शन घेण्यासाठी मराठवाड्यातील व नांदेड जिल्ह्यातील व परीसरातील बौध्द बांधवांना मोठ्या प्रमाणात जाण्या येण्यासाठी मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी रेल्वेमंत्रालयाकडे पाठपुरावा करावा आणि हुजुरसाहीब नांदेड ते बुध्दगया जंक्शन रेल्वे सेवा दररोज सुरु नांदेडसह मराठवाडा व परिसरातील बौध्द बांधवाची होणारी गैरसोय दूर करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते उमाकांत सरोदे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## आमदार चिखलीकर यांच्या उपस्थितीत आज लोह्यात सार्वजनिक शिवजयंतीचे आयोजन

**लोहा (प्रतिनिधी)**– लोहा मतदार संघाचे आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या उपस्थितीत व युवानेते प्रविण पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली शहरात दि.१९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. या निमित्त भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त सार्वजनिक शिवजयंती मंडळाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जोपासत येथील उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळे वाटप करण्यात येतील. तसेच जिल्हा परिषदेच्या अनाथ मुलांच्या वसतिगृहात शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात येणार आहे.

जुना लोहा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते दुग्धाभिषेक करून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मुर्तीची मिरवणूक काढण्यात येणार आहे. ढोल ताशांच्या गजरात फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करून हाती, घोडे, मावळे यांच्या जिवंत देखावे हो मिरवणुकीचे मुख्य आकर्षण असणार आहे.

या कार्यक्रमाला शिवप्रेमींनी उपस्थित रहावे, असे आवाहन सार्वजनिक शिवजयंती मंडळाचे अध्यक्ष केशव पवार, संयोजक नगरसेवक भास्कर पाटील पवार, स्वागताध्यक्ष जीवन चव्हाण, उपाध्यक्ष गणेश कल्याणकर यांनी केले आहे.

## जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड जिल्ह्यात २ मार्च पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू करण्यात आला आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात २ मार्चपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू केला आहे. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही. अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

# समृद्ध भारतासाठी महामानवाचे विचार आत्मसात करावे -डॉ.शंकर गड्डमवार




**नायगांव बाजार (प्रतिनिधी)** – मानव फक्त आपले कुटुंब व नातेवाईक यांच्यासाठी धडपडतो. परंतु महामानवांनी मात्र जगाच्या कल्याणासाठी आयुष्यभर संघर्ष केला. लोकांचे प्रबोधन केले. आपल्या घराची राख रांगोळी झाली तरीही ते पर्वा बघितली नाही एवढा मोठा त्याग त्यांनी लोकांसाठी पत्करलेला होता. म्हणून समृद्ध भारत निर्माण करण्यासाठी आपण सर्वांनी महापुरुषांचे विचार आत्मसात केल्याशिवाय पर्याय नाही, असे प्रखड मत विचारवंत प्रा. डॉ. शंकर गड्डमवार यांनी बहिशाल व्याख्यानमालेत व्यक्त केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व शरदचंद्र महाविद्यालय नायगाव बाजारच्या संयुक्त विद्यमाने शेळगाव छत्री येथील जिल्हा परिषद शाळेत बहिशाल व्याख्यानमाला घेण्यात आली. त्यावेळी ते व्याख्यान देताना बोलत होते. मुख्याध्यापक व्यंकटराव रामलोड हे अध्यक्षस्थानी होते.

यावेळी प्रसिद्ध विचारवंत प्रा.डॉ.शंकर गड्डमवार तर समन्वयक प्रो.डॉ.बलभीम वाघमारे, सुभाष वानखेडे, ईश्वर बिजगुरे यासह शेळगाव छत्री येथील युवा नेते संजय पाटील चोंडे, माजी सरपंच जळबा वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी महामानवांचे विचार प्रत्येक माणूस व विद्यार्थ्यांमध्ये कसे रुजले पाहिजे ही पार्श्वभूमी समन्वयक डॉ. बलभीम वाघमारे यांनी प्रस्तावनेतून मांडली.

मुख्याध्यापक व्यंकटराव रामलोड यांच्या वतीने मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. डॉ. गड्डमवार बोलताना पुढे म्हणाले की, सर्व मानवतावादी महापुरुषांना समाज कोणता अभिप्रेत होता ते भारतीय संविधानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नमूद केलेले आहे. एवढी प्रगल्भता या राष्ट्रपुरुषांच्या विचारात आहे आणि संविधानाने सर्वांना समान अधिकार प्राप्त केले असल्यामुळे त्या अधिकाराच्या बळावर भारत देश समृद्ध बनला पाहिजे, यासाठी महापुरुषाचे विचार आत्मसात करावे आणि भारत देश समृद्ध बनवावा असेही ते म्हणाले. यावेळी संभाजी निलावार, आनंदा दाडेराव, नागोराव बैलकवाड, भगवान बोंडलवाड, शंकर पाटील चोंडे व शालेय विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन प्रो. डॉ. बलभीम वाघमारे यांनी केले. तर पत्रकार माधव बैलकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# विद्यार्थ्यांनी नावलौकिक मिळवून आईवडिलांचा मान-सन्मान वाढवावा -ॲड. किशोर देशमुख

**अर्धापूर (प्रतिनिधी)** – विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने अभ्यास करून समाजात नावलौकिकता मिळवावी. तसेच आई-वडिलांचा मान सन्मान वाढवावा, असा सल्ला भाजप जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख यांनी दिला.



शहरातील आदर्श प्राथमिक विद्यालय व इंग्लिश मिडीयम लहान यांच्या संयुक्त विद्यमाने स्नेहसंमेलन घेण्यात आले. या संमेलनादरम्या घेण्यात आलेल्या विविध खेळांचे बक्षीस वितरण करतांना ते बोलत होते. स्नेह संमेलनातील पारितोषिक वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष विजय देवडे हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून भाजप जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख, नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विष्णूकांत कराळे, माजी उपनगराध्यक्ष राजेश्वर शेटे, सचिव पंडितराव लंगडे, गटनेते बाबुराव लंगडे, चेअरमन प्रवीण देशमुख, नगरसेवक मिर्झा शहाबाज बेग, नामदेव सरोदे, पंचायत राज तालुकाध्यक्ष तुळशीराम बंडाळे, सखाराम क्षीरसागर, शेख साबेर, अझर काजी, गंगाधर सोनटक्के, आनंद सोनटक्के, उध्दव सरोदे यांची उपस्थिती होती.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते यावर्षीचा आदर्श शिक्षिका पुरस्कार सहशिक्षिका अरूणा देवडे यांना देऊन गौरव करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विजयराव देवडे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी अधिकारी बनण्याची जिद्द बाळगून अभ्यास करून परिक्षेला सामोरे जावे असे आवाहन उपस्थित विद्यार्थ्यांना देवडे यांनी केले आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या सीईओ अनु शुक्ला, मुख्याध्यापक मारोती पावडे, शिक्षक सुरेश बेलखेडे, अरूणा देवडे, मिनाक्षी कानगुले, गोपाळकृष्ण पोपलवाड, प्रजावती कांबळे, संतोषी व्यवहारे, अश्विनी कंदुरके, निर्मला गजभारे, शाहिद यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र


# निरामय

# शाकाहारींनी हाडे मजबूत कशी करावीत?

**सध्याच्या धावपळीच्या जगात, आपल्या शरीराची काळजी घेणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. हाडांच्या आरोग्याचा विचार केला तर, व्हिटॅमिन D हे हाडांसाठी अत्यावश्यक आहे. व्हिटॅमिन D हाडांमध्ये कॅल्शियम शोषण्यास मदत करते, ज्यामुळे हाडं मजबूत होतात आणि हाडांसंबंधी समस्या, विशेषतः वृद्धावस्थेत कमी होतात. मात्र, आजच्या काळात अनेकांना व्हिटॅमिन D ची कमतरता जाणवते. ज्याचा थेट परिणाम हाडांच्या मजबुतीवर होतो. त्यामुळे हाडांना लोखंडासारखे मजबूत बनवण्यासाठी आपल्या आहारात व्हिटॅमिन D ने समृद्ध पदार्थांचा समावेश करणे खूप गरजेचे आहे. आज आम्ही तुम्हाला असे ७ पदार्थ सांगणार आहोत, ज्यामुळे तुमची हाडं निरोगी आणि मजबूत राहतील...**



- हिरव्या भाज्या : पालक, मेथी, शेपू, मोहरीची भाजी यासारख्या हिरव्या पालेभाज्या कॅल्शियमचा मोठा स्त्रोत आहेत. ज्यामुळे एकन् एक हाड लोखंडासारखे मजबूत बनते. शिवाय हिरव्या भाज्यांमुळे शरीराला अनेक पोषक तत्वे मिळतात, हिमोग्लोबिन वाढते व शरीर डिटॉक्सही होते.
- अंडी : अंड्याच्या पिवळ्यात (योल्क) नैसर्गिक व्हिटॅमिन D असते. जर तुम्ही दररोज एक अंडे खाल्ले, तर तुम्हाला आवश्यक असलेले व्हिटॅमिन D सहज मिळू शकते. यामुळे हाडांच्या मजबुतीसाठी अंडी खाणे एक सोपी आणि परिणामकारक पद्धत आहे. याशिवाय अंड्यांमध्ये प्रथिनांचे प्रमाणही जास्त असते, जे शरीराच्या इतर भागांसाठीही आवश्यक आहे.
- मशरूम : मशरूम हा व्हिटॅमिन D चा नैसर्गिक स्त्रोत आहे. विशेषतः सूर्यप्रकाशात उगवलेल्या मशरूममध्ये भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन D असते. दररोजच्या आहारात मशरूमचा समावेश केल्यास तुम्हाला हाडांच्या आरोग्यासाठी आवश्यक असलेले व्हिटॅमिन D मिळू शकते. मशरूमचे विविध पदार्थ बनवून तुम्ही मस्त याचा आस्वाद घेऊ शकता.
- दूध आणि दुग्धजन्य पदार्थ : दूध आणि त्यापासून तयार होणारे पदार्थ जसे की दही, पनीर हे व्हिटॅमिन D आणि कॅल्शियमचे उत्कृष्ट स्त्रोत आहेत. नियमित दूध पिणे आणि दुधाचे इतर पदार्थ आहारात सामील केल्याने हाडं मजबूत होतात. अनेक दुग्धजन्य पदार्थांमध्ये कॅल्शियम आणि व्हिटॅमिन D यांचे प्रमाण जास्त असते, जे हाडांसाठी आवश्यक आहे.
- ओट्स आणि कडधान्ये (फोर्टिफाइड) : अनेक ओट्स आणि कडधान्यांमध्ये व्हिटॅमिन D चा समावेश करून त्यांचे पोषण मूल्य वाढवले जाते. तुम्ही नाश्त्याला असे फोर्टिफाइड ओट्स आणि कडधान्यांचा समावेश करून हाडांच्या आरोग्याची काळजी घेऊ शकता. हे पदार्थ तुम्हाला दिवसभरासाठी ऊर्जा देण्याबरोबरच हाडं मजबूत करतात. हाडांच्या मजबुतीसाठी व्हिटॅमिन D अत्यंत महत्त्वाचे आहे. वर सांगितलेले पदार्थ आपल्या नियमित आहारात सामील करून तुम्ही तुमची हाडं लोखंडासारखी मजबूत करू शकता.
- ऑरेंज ज्यूस (व्हिटॅमिन D फोर्टिफाइड) : काही ऑरेंज ज्यूस हे व्हिटॅमिन D घालून तयार केले जातात. अशा ज्यूसचे नियमित सेवन तुम्हाला हाडांच्या मजबुतीसाठी फायदेशीर ठरू शकतो. याशिवाय, ऑरेंज ज्यूसमध्ये असलेल्या व्हिटॅमिन C मुळे कॅल्शियमचे शोषण वाढते, ज्यामुळे हाडांचे आरोग्य सुधारते.
- टोफू पनीर : टोफू पनीर हा शाकाहारींसाठी एक उत्कृष्ट पर्याय आहे, जो व्हिटॅमिन D आणि कॅल्शियमने समृद्ध असतो. टोफू पनीरमध्ये असलेले पोषक घटक हाडं मजबूत करण्यास मदत करतात. नियमित टोफू खाल्ल्याने तुम्हाला आवश्यक पोषण मिळते, ज्यामुळे तुमच्या हाडांची ताकद वाढते आणि तुम्ही अधिक सक्रिय राहू शकता.
- सब्जा बिया : चिया सीड्स किंवा सब्जा बियांमध्ये कॅल्शियम, मॅग्नेशियम, फायबर, फॉस्फरस असते जे हाडांच्या आरोग्यासाठी अतिशय महत्त्वाचे ठरते. शिवाय या बियांचे पाणी प्यायल्याने वजनही कमी होते आणि हाडांवर येणारा अतिरिक्त भार कमी होतो व हाडे मजबूत बनतात.
- फॅटी फिश : फॅटी फिश म्हणजे सॅल्मन आणि मॅकेरल हे मासे व्हिटॅमिन D च्या उत्तम स्त्रोतांपैकी एक आहेत. हे मासे हाडांसाठी आवश्यक असलेल्या ओमेगा-३ फॅटी ॲसिड्सनेही समृद्ध असतात, जे हाडांची आणि सांध्यांची ताकद वाढवतात. आठवड्यातून किमान एकदा फॅटी फिश खाणे हाडांच्या आरोग्यासाठी अत्यंत लाभदायक ठरू शकते.



# ५ वाईट सवयींमुळे हाडे खिळखिळी!

**लोकांना वाटते की संधिवात ही एक वृद्धावस्था आहे आणि आपल्या सर्वांनाच आयुष्यात कधी ना कधी या समस्येचा सामना करावाच लागतो. पण आपल्या आजूबाजूला असे अनेक वृद्ध लोक आपल्याला दिसतात जे सांधेदुखीची अजिबात तक्रार करत नाहीत. म्हणून हे समजून घेणे महत्वाचे आहे की केवळ वय हेच सांधेदुखीच्या समस्यांचे कारण असू शकत नाही. आपल्या जीवनशैलीशी निगडीत असे अनेक घटक आहेत, ज्यामुळे कमकुवत हाडे आणि सांध्याशी निगडीत समस्या निर्माण होतात. पण ते आपल्या नियंत्रणात आहेत. अशा परिस्थितीत, जर तुम्ही या वाईट सवयी सुधारू शकलात तर तुम्ही कमी वयात हाडांचे होणारे नुकसान कमी करू शकता आणि निरोगी आयुष्य जगू शकता.**

## अति प्रमाणात मीठ खाणं...

मिठाचे जास्त प्रमाणात सेवन आणि हाडांची घनता कमी होण्यामध्ये थेट संबंध आहे. जसे तुम्ही तुमच्या आहारात सोडियम युक्त पदार्थांचे सेवन वाढवता तेव्हा ते तुमच्या शरीरात आणि मूत्रात अधिक कॅल्शियम सोडते. हाड विषेतज्ञ म्हणतात, की दररोज अतिरिक्त ग्रॅम सोडियम खाल्ल्याने प्रौढ स्त्रिया दरवर्षी त्यांच्या हाडांची घनता १ टक्क्यांपर्यंत गमावू शकतात. म्हणूनच डॉक्टरांनी दररोज २,३०० मिलीग्रॅमपेक्षा कमी सोडियम घेण्याचा सल्ला दिला आहे, तर बहुतेक प्रौढ पुरुषांनी दररोज १,५०० मिलीग्रॅमपेक्षा जास्त मीठ खाऊ नये.

- धूम्रपान : हाडांचे सर्जन स्पष्ट करतात की तंबाखू तुमच्या शरीराच्या ऊतींमध्ये एक प्रकारचा अणू तयार करतो ज्याला फ्री रॅडिकल्स असे म्हणतात. हे केवळ आपल्या फुफ्फुसांसाठीच नव्हे तर आपल्या हाडांसाठी देखील हानिकारक असते. जे लोक तंबाखू खातात त्यांच्या हाडांची घनता कमी असते. फ्री रॅडिकल्स तुमच्या हाडे बनवणाऱ्या पेशी मारू टाकते. धूम्रपान स्ट्रेस हार्मोन कोर्टिसोलचे उत्पादन वाढवते आणि कॅल्सीटोनिन हार्मोनचे उत्पादन कमी करते. कोर्टिसोल आपल्या हाडांचा साठा किंवा मजबूती कमी करण्यासाठी ओळखलं जातं तर दुसरीकडे कॅल्सीटोनिन त्याची देखभाल करतं. डॉक्टर पुढे इशारा देतात की जर तुम्हाला पूर्वी हाडांचे फ्रॅक्चर झाले असेल तर धूम्रपान तुमच्या रक्तवाहिन्यांना हानी पोहोचवून उपचार प्रक्रिया मंद करते.
- गतिहीन होणे : बसून असलेल्या लोकांना अधिक वेगाने हाडांचे आजार होण्याचा धोका असतो. स्नायूंचे आकुंचन तुमची हाडे मजबूत करते. म्हणूनच जेव्हा प्रश्न हाडांच्या आरोग्याचा येतो तेव्हा व्यायाम करणे खूप महत्वाचे असते. वजन कमी करणारे व्यायाम जसे की वेगाने चालणे किंवा ब्रिस्क वॉकिंग तुमच्या हाडांचे आरोग्य सुधारते.
- भरपूर दारू पिणे : दारूसुद्धा तुमच्या शरीरातील कोर्टिसोलचे उत्पादन वाढवते, ज्यामुळे हाडांचा साठा व मजबूती कमी होते. दारू आपल्या शरीरातील टेस्टोस्टेरॉन आणि एस्ट्रोजेनची हार्मोन्सची पातळीदेखील कमी करते. हे दोन्ही हार्मोन्स हाडांच्या आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे असतात.

## सूर्यकिरणांच्या जास्त संपर्कात येऊ नये...

हाड वैद्यांच्या मते, आपल्या हाडांची ताकद राखण्यासाठी व्हिटॅमिन डी खूप महत्वाचे आहे. व्हिटॅमिन डी शिवाय आपली हाडे पातळ आणि ठिसूळ होऊ शकतात. सूर्यप्रकाश हा व्हिटॅमिन डी च्या मुख्य स्त्रोतांपैकी एक आहे, म्हणून जर तुम्ही बाहेर पुरेसा वेळ घालवला नाही तर तुम्हाला या पोषक तत्वाची कमतरता भासू शकते. म्हणून, आपण आपल्या आहारात व्हिटॅमिन डी समृद्ध पदार्थांचे सेवन वाढवावे. हाडांच्या आरोग्यासाठी कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी आवश्यक आहे. परंतु बरेच प्रौढ पुरेसे कॅल्शियमयुक्त आहार घेत नाहीत. आपल्याला दोन्ही पोषक तत्त्वे पुरेशी मिळत आहेत की नाही हे सुनिश्चित करण्यासाठी कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी युक्त आहारासंबंधित आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या. हाडांच्या आरोग्याकडे सहसा दुर्लक्ष केले जाते, म्हणून वृद्धत्व येताच लोक हाडांच्या वेदनांशी झुंजतात. म्हणून योग्य वेळी हाडांच्या आरोग्यात अडथळा आणणाऱ्या वाईट सवयी टाळा आणि निरोगी व हेल्दी जीवन जगण्याचा प्रयत्न करा.



# हाडांतील कॅल्शियम शोषून घेणारे 10 पदार्थ

हाडे हा शरीराचा सर्वात महत्वाचा भाग आहे. संपूर्ण शरीर हाडांवर अवलंबून असते, म्हणून हाडे मजबूत असणे महत्वाचे आहे. हाडांमधील कोणत्याही प्रकारची कमजोरी किंवा रोग संपूर्ण शरीराला धोकादायक ठरू शकतं. शरीराला आकार देण्याव्यतिरिक्त हाडांची अनेक कार्ये असतात. हे शरीराच्या महत्वाच्या अवयवांचे संरक्षण करते आणि आपल्याला चालण्या-फिरण्यास मदत करते. याशिवाय हाडांचे सर्वात महत्त्वाचे कार्य अस्थिमज्जासाठी एक वातावरण तयार करणं, जिथे रक्त पेशी तयार होतात आणि ते खनिजे, विशेषतः कॅल्शियमचं भंडार करण्यास मदत करतात. जन्माच्या



वेळी मानवी शरीरात सुमारे २७० मऊ हाडे असतात. शरीराची वाढ होत असताना केवळ २०६ हाडे उरतात. हाडे मजबूत करून त्यांच्या चांगल्या कार्यासाठी निरोगी आहार आवश्यक आहे. मजबूत हाडांसाठी कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी आवश्यक असते. त्यांच्या योग्य प्रमाणामुळे हाडांचा आजार ऑस्टिओपोरोसिसला प्रतिबंध करण्यास मदत होते. पण तुम्हाला माहीत आहे का की रोज खाल्लेल्या काही गोष्टी हाडे कमकुवत करतात. हे पदार्थ इतके धोकादायक आहेत की ते शरीराला कॅल्शियम शोषण्यापासून रोखू शकतात, हाडांतील खनिजांची घनता कमी करू शकतात आणि बरेच नुकसान करू शकतात. चला तर जाणून घेऊया ते पदार्थ कोणते आहेत...

- अधिक सोडियमवाले पदार्थ : तुम्ही जितके जास्त मीठ खाल तितके जास्त कॅल्शियम कमी होईल. मीठ किडनीद्वारे अधिक कॅल्शियम उत्सर्जित करतं. ते मीठ कमी वापरण्याचा सल्ला देतात. त्यांच्या मते, एका दिवसात २३०० मिलीग्रामपेक्षाही कमी मीठ खावे.
- गोड स्नॅक्स : जास्त प्रमाणात गोड पदार्थांचे सेवन करणे केवळ हाडांसाठीच नाही तर सर्वच अवयवांसाठीही घातक आहे. साखरेचे सेवन केल्याने हाडांवर नकारात्मक परिणाम होतो याचा खरं तर काहीही थेट संबंध नाही, पण जेव्हा लोक जास्त प्रमाणात गोड खातात आणि आवश्यक पोषक तत्वांनी समृद्ध अन्नपदार्थ त्यांच्या शरीराला मिळत नाहीत तेव्हा हाडांचे नुकसान होऊ शकते.
- सोडा : जर तुम्ही खूप जास्त सोडा पित असाल तर ते तुमच्या हाडांसाठी हानिकारक ठरू शकते. दर आठवड्याला सात किंवा त्यापेक्षा अधिक सोडा किंवा कोल्ड ड्रिंक प्यायल्याने हाडांतील खनिज घनता कमी होऊ शकते आणि फ्रॅक्चरचा धोका वाढू शकतो. त्यांच्यामधील हिप फ्रॅक्चरचा धोका वाढतो.
- कॅफिन : कॅफिनचे सेवन स्त्रियांमधील हाडांची घनता कमी करू शकते. कॅफिन हाडांमधून कॅल्शियम बाहेर काढून टाकते आणि त्यांची ताकद कमी करते. असे मानले जाते की प्रत्येक १०० मिलीग्रॅम कॅफिन सुमारे ६ मिलीग्रॅम कॅल्शियम शोषून घेते.
- दारूचे सेवन : जे जास्त प्रमाणात मद्यपान करतात, त्यांच्या हाडांची घनता कमी होते. दिवसातून २ ते ३ ग्लासांपेक्षा जास्त अल्कोहोलचे सेवन करू नये.
- इनफ्लेमेट्री फूड : टोमॅटो, मशरूम, मिरची, पांढरे बटाटे आणि वांगी यांसारख्या नाईटशेड भाज्यांमुळे हाडांमध्ये सूज निर्माण होऊ शकते. ज्यामुळे ऑस्टिओपोरोसिस होऊ शकतो. तथापि, या भाज्यांमध्ये इतर जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात जी तुमच्या आरोग्यासाठी चांगली असतात. त्यामुळे मर्यादित प्रमाणात न चुकवता याचे सेवन करावे.
- कच्चा पालक : पालकमध्ये हाडांसाठी आवश्यक असलेले निरोगी कॅल्शियम असते परंतु त्यात ऑक्सलेट नावाचे पदार्थ देखील असतात, जे त्या कॅल्शियमचे प्रमाण कमी करू शकतात. अशा खाद्यपदार्थांसोबतच तज्ज्ञांनी शरीराची कॅल्शियम शोषण्याची क्षमता वाढवणारे पदार्थ खाण्याचीही शिफारस केली आहे.

# विशीतच हाडे कमजोर?

**पूर्वी लोकं अगदी नव्वदी उलटली तरी फिट असायची, पण आता तेच प्रमाण अगदी विशी पंचवीशीत आलंय असं म्हटलं तर चुकीचं ठरणार नाही. आताच्या तरुणांना अगदी तिशीच्या आतच हाडांच्या समस्या सुरू होतात. हाडांमधून आवाज येणे, सांधेदुखी किंवा हाडांची कमकुवतता या समस्या तर सर्रास पाहायला मिळतात. याचं मुख्य कारण म्हणजे कॅल्शियमची कमतरता. आपल्या शरीरात कॅल्शियमचं महत्त्व खूपच मोठं आहे. हाडांची मजबुती टिकवण्यासाठी कॅल्शियम आवश्यक आहे आणि त्याचा नियमित पुरवठा नसेल तर हाडं कमकुवत होतात, सांधे दुखू लागतात आणि हाडांमधून आवाज येऊ लागतो. यासाठी आहारात काही विशेष पदार्थांचा समावेश करणे खूप महत्त्वाचे आहे.**

- तिळाच्या बिया : तिळाच्या बियात मोठ्या प्रमाणात कॅल्शियम असतं. रोज एक चमचा तिळाच्या बिया खाल्ल्यास तुमच्या शरीरात कॅल्शियमचं योग्य प्रमाण राहतं. तिळाच्या बियांचा लाडू किंवा चटणीदेखील करून खाऊ शकता. हे हाडं मजबूत करतं आणि त्यांची लवचिकता वाढवते.
- मखाणे : मखाणे म्हणजेच कमळाच्या बियाचं फळ हे कॅल्शियम आणि प्रथिनांचा उत्तम स्त्रोत आहे. रोजच्या आहारात मखाण्यांचा समावेश केल्यास हाडांच्या समस्या दूर होऊ शकतात. तुम्ही मखाणे तळून किंवा त्याची मस्त रेसिपी बनवून सेवन करू शकता. हे स्नॅकच्या स्वरूपात खाण्यायोग्य असतं आणि त्यात कॅल्शियमचं प्रमाण खूप चांगलं असतं.
- अंजीर : अंजीर हे फळ फक्त चवीसाठीच नाही तर आरोग्यासाठीही खूप उपयुक्त आहे. त्यात कॅल्शियमचं प्रमाण जास्त असल्यामुळे ते हाडांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. दररोज २-३ अंजीर खाल्ल्यास हाडांना आवश्यक पोषण मिळतं. यामुळे हाडं मजबूत होतात आणि सांधेदुखीपासून आराम मिळतो.
- रागी : रागी म्हणजेच नाचणी हे कॅल्शियमचं भांडार आहे. रागीचं पीठ वापरून भाकरी, डोसा किंवा खीर बनवता येते. रागीमुळे हाडांना मजबूत बनण्यास मदत होते आणि त्यात असलेलं नैसर्गिक कॅल्शियम हाडांची मजबुती टिकवण्यास मदत करतं.
- राजगिरा : राजगिरा हे एक असं धान्य आहे ज्यात भरपूर कॅल्शियम असतं. राजगिराचा लाडू किंवा खीर खाल्ल्यास हाडांना आवश्यक पोषण मिळतं. राजगिरात कॅल्शियमबरोबरच इतर महत्त्वाचे घटकही असतात, जे शरीरातील कॅल्शियम शोषण प्रक्रिया सुधारतात.
- कॅल्शियमच्या कमतरतेमुळे हाडांमधून आवाज येणे किंवा सांधेदुखी होणे सामान्य समस्या आहे, परंतु योग्य आहाराने ती नियंत्रित करता येते. या कॅल्शियमयुक्त पदार्थांचा समावेश आपल्या दैनंदिन आहारात करून आपण हाडांच्या आरोग्याची काळजी घेऊ शकतो आणि जीवनभर हाडं मजबूत ठेवू शकतो.



# एसएनडीटी विद्यापीठाने ग्रामीण भागातील शाळांशी संपर्क वाढवावा –राज्यपाल




**मुंबई (प्रतिनिधी)** – स्थापनेचे १०९ वे वर्ष साजरे करीत असलेल्या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाने अधिकाधिक मुलींना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी राज्यातील, विशेषतः ग्रामीण व आदिवासी भागातील, शाळांशी संपर्क वाढवावा, असे आवाहन राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत महिला विद्यापीठाचा ७४ वा दीक्षांत समारोह विद्यापीठाच्या पाटकर सभागृहात सोमवारी (दि. १७) संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते.

महिला विद्यापीठाने नुकतेच चंद्रपूर येथे उपकेंद्र सुरू केले असल्याचे नमूद करून विद्यापीठाने आदिवासी भागातील मुलींची उच्च शिक्षणातून होणारी गळती कमी करण्याच्या दृष्टिने या संपूर्ण समस्येचे अध्ययन करावे, अशी सूचना राज्यपालांनी यावेळी केली. विद्यापीठाने पारंपरिक अभ्यासक्रमांशिवाय विद्यार्थिनींना कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, आरोग्य सेवा व्यवस्थापन आदी क्षेत्रातील आधुनिक पदवी अभ्यासक्रम उपलब्ध करुन द्यावे, असेही यावेळी राज्यपाल यांनी सांगितले.



























## जाहीर प्रगटन

नमुना ९ नियम १४ व २४ पहा

महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ यांच्या कलम १५० ( २ ) अन्वये सुचना ज्याअर्थी तालुका :- भोकर गाव भोकर गावच्या फेरफाराच्या नोंदवहीत खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे जमिनीतील अधिकारांच्या संपादनासंबंधी नोंद करण्यात आली आहे.

फेरफाराच्या नोंदवहीतील नोंदीचा अनुक्रमांक १००४७५ संपादन केलेल्या अधिकाराचे स्वरुप-नोदीचा प्रकार:- खरेदी माहिती मिळालेचा दिनांक:- १३/२/२०२५ फेरफाराचा दिनांक:- १४/२/२०२५ लिहुन देणार: बाबुराव पोतन्ना रा.भोकर (खाता क्रमांक ४६९) यांचे गट/सर्व्हे क्रमांक २७२, लागवडी योग्य क्षेत्र १.०२०५ हे.आर.चौरस.मीटर पैकी लागवडी योग्य क्षेत्र ०.०१८५ हे.आर.चौ.मी आणि पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर.चौ.मी हे त्यांनी सदरील पोतन्ना ओमाजी तमलवाड दिनांक २३/११/१९८४ ला हा प्लॉट विक्री केला असून हा आज रोजी बाबुराव पोतन्ना यांच्या नावे असून ते क्षेत्र त्यांच्या खात्यातुन कमी करण्यात येत आहे.

लिहुन घेणार :साईनाथ लक्ष्मणराव गटकेपोड, (खाता क्रमांक :-९९९१) गट/सर्व्हे क्रमांक २७२ लागवडी योग्य क्षेत्र ०.०१८५ हे.आर.चौ.मी आणि पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर.चौ.मी यांना दुय्यम निबधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडील खरेदी दस्त क्रमांक २१० दिनांक १३/२/२०१४ प्रमाणे रक्कम रुपये २,८०,००० घेऊन खरेदी दिली. सबब खरेदी घेणा-याचे नाव गाव नमुना नं. ७/१२ वर दाखल केले.संमती देणारे खातेदार विलासराव पुंडलिकराव भोसीकर दस्त क्र.४६२० दिनांक २३/११/१९८४ विजयराव भाउसाहेब सावंत दस्त क्रमांक १००४ दिनांक ११/२/१९९१ आणि ज्याअर्थी, , तुमचा उक्त फेरफारात हितसंबंध आहे असे अधिकार अभिलेखावरुन / फेरफाराच्या नोंदवहीवरुन मला वाटते; आणि ज्याअर्थी उक्त फेरफारात तुमचा हितसंबंध आहे असे मानण्यास मला संयुक्तिक कारण आहे.

त्याअर्थी आता मी, अनिल तुकाराम मुनेश्वर ज्या ठिकाणी उपरोक्त जमीन आहे त्या गावाचा ग्राम महसूल अधिकारी याव्दारे, उक्त फेरफाराच्या नोंदी संबंधी तुम्हांस सूचना देत आहे व ही सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत उक्त नोंदीसंबंधी तुमची हरकत कोणतीही असल्यास, ती तोंडी किंवा लेखी पाठविण्यास तुम्हांस फर्मावित आहे. ग्राम महसूल अधिकारी भोकर यांच्याकडे उक्त पंधरा दिवसांच्या मुदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास, उक्त नोंदीस तुमची संमती आहे, असे गृहीत धरले जाईल, कृपया याची नोंद घ्यावी.

**स्वा/-**
**तलाठी सज्जा भोकर**
बाबुराव पोतन्ना, विजयराव भाउसाहेब सावंत, साईनाथ लक्ष्मणराव गटकेपोड सर्व रा.भोकर जिल्हा नांदेड


ऑफर ऑफर A/C ऑफर
**म हा रा ष्ट्र जेन्टस् ब्युटी सलुन**

फेशियल
१) गोल्ड फेशियल 499/-
२) VLCC फेशियल 499/-
३) डायमंड फेशियल 599/-

डी-टॅन
१) O3+ 349/-
२) रागा 299/

ब्लीच
१) ऑक्सी ब्लीच 299/-
२) ओलिविया ब्लीच 299/-

कलर
१) लोरियल 299/-
२) मॅट्रिक्स 299/-
३) रागा 249/-
४) गार्नियर 199/-

हेयर स्पा
१) लोरियल 249/-
२) मॅट्रिक्स 249/-

हॉटेल मंजू समोर, वजिराबाद, नांदेड. 9822972221



**CONSULTING PHYSIOTHERAPIST**
**कन्सल्टिंग फिजिओथेरपीस्ट**
डॉ.ईश्वर जी. हिंगोलीकर (PT) (B.P. Th)
उपलब्ध सुविधा
- कपिंग थेरपी (गोल्ड मेडलिस्ट)
- ड्राय नीडलींग थेरपीस्ट
- ऑर्थोपेडिक रिहॅबिलिटेशन
- टेपींग थेरपीस्ट
- न्यूरो रिहॅबिलिटेशन

नांदेड
होम व्हिजीट उपलब्ध 9657631231







## जाहीर सुचना

आम जनतेस सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार श्री. सुब्बाराव पापय्या पुलीचारला, रा. नागार्जुनानगर, ता. जि. नांदेड, यांच्या सूचनेप्रमाणे पुढील वर्णनाच्या मालमत्ते संदर्भात सूचना देण्यात येते की, नागार्जुनानगर, बालाजीनगर, ता. जि. नांदेड येथे प्लॉट नं. ०८ आहे ज्याचे क्षेत्र ३९ x ७५ चौ. फुट आकाराचे आहे. याचे मालकीसंबंधित असलेले मुळ खरेदीखत क्रमांक १०१६ / १९९३, दिनांक ०२.०४.१९९३, दुय्यम निबंधक नांदेड यांच्या कार्यालयात श्री. प्यारय्या पापय्या पुलीचरेल, यांच्या नावे नोंदणी झालेले कागदपत्रे, हे दि. १३.०२.२०२५ रोजी सकाळी ११:०० वा. सुमारास नमस्कार चौक ते महाराणा प्रताप चौक येथे मोटरसायकलने जात असतांना डीकीतुन हरविले / गहाळ झाले आहे. जर कुठल्याही व्यक्तीला ते सापडल्यास / आढळल्यास, मला खालील पत्त्यावर कळवावे, किंवा कुठल्याही व्यक्तीला / वित्तीय संस्थेला, या मालमत्ते संदर्भात खरेदी / बक्षीस / अदलाबदल / गहाण व इतर कुठल्याही स्वरुपाचा हक्क / अधिकार / आक्षेप असल्यास लेखी स्वरुपात या जाहीर सुचनेपासून ७ दिवसाच्या आत मला खालील पत्त्यावर कळवावे. जर ७ दिवसाचे आत कुणाचाही अथवा कुठल्याही स्वरुपाचा हक्क / अधिकार / आक्षेप न आल्यास त्यानंतर कोणाचाही अथवा कुठल्याही स्वरुपाचा हक्क / अधिकार / आक्षेप स्वीकारण्यात येणार नाही. अथवा माझ्या पक्षकाराला बंधनकारक राहणार नाही.

स्थळ: नांदेड.दिनांक: १८.०२.२०२५

**अॅड.वास.एस.देशमुख अर्धापुरकर**
**गुरूकृपा मार्केट दुसरा मजला महावीर चौक नांदेड**
**मो.९४२०९११६२०**

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार मोहम्मद रशीद पि. अब्दुल रउफ, वय: ४३ वर्षे, धंदा: व्यवसाय, रा. बरकत कॉम्प्लेक्स इतवारा, नांदेड यांनी दिलेल्या माहिती, सुचणे व अधिकारा नुसार सदरील जाहीर प्रगटन देण्यात येत आहे कि,

हे कि, माझे पक्षकार यांनी, धनुलाल बाबूलाल चौधरी, वय: ५८ वर्षे, धंदा: व्यवसाय, रा. शिवाजी नगर, नांदेड यांच्या कडून हे मौजे नांदेड ता. जि. नांदेड येथील नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील शेत सर्वे नं. १४१/१ पैकी प्लॉट नं. ४४ व ५७ पूर्ण व प्लॉट नं. ४५ चा दक्षिणेकडील भाग आहेत. ज्यांची एकत्रित एकुण लांबी पुर्व- पश्चिम ८० फुट म्हणजे २४.३९ मी. आहे. व रुंदी दक्षिण-उत्तर पश्चिमेकडून २४ फुट ६ इंच म्हणजे ७.४६ मी. व पुर्वेकडील बाजु ८ फुट ३ इंच २.५१ मी. व मधीली बाजु २५ फुट म्हणजे ९ इंच म्हणजे ७.८५ मी. आहे. ज्यांचे एकुण क्षेत्रफळ १३२० चौ. फुट म्हणजे १२२.६७चौ.मी. आहे. ज्याची चतु:सीमा पुढील प्रमाणे आहे, ज्यांची एकत्रित चतु:सीमा पुर्वेस: १८.६ फुट रुंद रोड आहे, पश्चिमेस: १९ फुट रुंद रोड आहे, दक्षिणेस: मालटेकडी स्टेशन रोड व मुळ मालक यांची जागा आहे, उत्तरेस: प्लॉट नं. ४५ चा भाग व प्लॉट नं. ५८ चा भाग आहेत. जो आंतरिक व बाह्य हक्कांसहित, माझ्या पक्षकाराने विकत घेण्याचा करार करणार आहेत.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते कि, सदरच्या व्यवहारासंबंधी कोणासही हक्कसंबंध, हितसंबंध, अधिकार किंवा सरकारी, निमसरकारी, वित्तीय संस्थेस अथवा कोणासहि काही हारकत, आक्षेप उजर असल्यास त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिद्ध झाल्या तारखेपासून ७ दिवसांच्या आत कागदपत्रांसह लेखी आक्षेप नोंदवून पोच घ्यावी. मुदती नंतर आलेला आक्षेप माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. सदरील जागा ही निर्विवाद समजून माझे पक्षकार सदरचा व्यवहार पूर्ण करतील. करीता हे जाहीर प्रगटन,

**जाहीर प्रगटन देणार**
**मोहम्मद रशीद पि.अब्दुल रउफ**
**रा.बरकत कॉम्प्लेक्स इतवारा**
**नांदेड मो.७०२०५९७१२४**

**मार्फत,**
**अॅड.ए.बी.शाहरूख**
**जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड**

## Change In Name

My Old Name is MANOJ RAOSAHEB MORE which now I am changing as New Name MANOJKUMAR RAOSAHEB MORE.Henceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same ADD- SAI NIWAS CHIKHALWADI CORNER NANDED 431601 MO.9422188518

## सनद हरवली

माझी संघमित्रा नाथराव वडगावकर या नावाची सनद व मार्कमेमो सावित्रीबाई फुलेनगर ते वजीराबाद ऑटो प्रवासात हरवली आहे. मला शासकीय कामासाठी १० वी च्या टि. सी ची आवश्यकता असून कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधा.

**संपर्क पत्ता**
**संघमित्रा नाथराव वडगावकर**
**मो.९८५०९९३८९१**






## Change In Name

My Old Name is Padma Narayan Molgulwar which now I am changing as New Name Padma Bharat Kunturkar.Henceforth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same. Signed By: Padma Bharat Kunturkar Current Address: P.NO. 71, PARVANA NAGAR, Near Ganpati Temple Taroda (Khu),NANDED 431605

Permanent Address: P.NO. 71, PARVANA NAGAR, Near Ganpati Temple Taroda (Khu),NANDED 431605

## नगरपरिषद भोकर
### जाहीर प्रगटन
**नाव परिवर्तन करणे बाबत**

जा.क्र./नपभो/नानो६/८७९

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,कृष्णा केशवराव पवार यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.- गट.नं.- ६०३ जुना वार्ड नं.- ३ मधील प्लॉट नंबर -मालमत्ता नं.६२५ नविन वार्ड नं.२ नविन मालमत्ता नं.३३० साईज पुर्व पश्चिम ४.५७ , दक्षिण उत्तर ९.१४, चुर्तसिमा पुर्वे -एस.बी. चव्हाण, पश्चिम: केशव पवार यांचा प्लॉट, दक्षिण :२० फुट रस्ता, उत्तर :१० फुट रस्ता, सौ.अनिता मारोतराव गायकवाड यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खता अधारे वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.त्यासंबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ७ दिवसांच्याअ ात लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा. अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत असे गृहीत धरून खरेदीखताच्या अधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर
### जाहीर प्रगटन
**नाव परिवर्तन करणे बाबत**

जा.क्र./नपभो/नानो६/८४२

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,विनोद किशनराव मुपडे यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.- गट.नं.- ५५४ जुना वार्ड नं.-३ मधील प्लॉट नंबर - ६७ मालमत्ता नं.२७७२ नविन वार्ड नं.२ नविन मालमत्ता नं.१३७४ साईज पुर्व पश्चिम ३० फुट, दक्षिण उत्तर ४०फुट., चुर्तसिमा पुर्वे -२० फुटाचा रस्ता, पश्चिम: बिंदू यांचे शेत, दक्षिण : शेख बसीर यांची प्लॉटींग, उत्तर :प्लॉट नंबर ६६, सुरेखा चंद्रकांत जाधव यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खता अधारे वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे. त्यासंबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ७ दिवसांच्याअ ात लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा.अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत असे गृहीत धरून खरेदीखताच्या अधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर
### जाहीर प्रगटन
**नाव परिवर्तन करणे बाबत**

जा.क्र./नपभो/नानो६/- ७७८

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,दत्ता हणमंतु संगनवाड यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.- गट.नं.२५४ जुना वार्ड नं.-५ मधील प्लॉट नंबर १६५ मालमत्ता नं.एच-१३२/१५ नविन वार्ड नं.१६ नविन मालमत्ता नं.१५०१/१५ साईज पुर्व पश्चिम १२.१९ मी , दक्षिण उत्तर ९.१४ मी, चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर १७०, पश्चिम: ६ मीटर रस्ता, दक्षिण : प्लॉट नंबर १६४,उत्तर :प्लॉट नंबर १६६, गोविंद संभा गटकेपोड यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खता अधारे वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे. त्यासंबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ७ दिवसांच्याअ ात लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा. अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत असे गृहीत धरून खरेदीखताच्या अधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर
### जाहीर प्रगटन
**नाव परिवर्तन करणे बाबत**

जा.क्र./नपभो/नानो६/-८७७

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,गणेश किशनराव कोठूळे यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.- गट.नं.- ३६६ जुना वार्ड नं.-५ मधील प्लॉट नंबर - १७ मालमत्ता नं.सी-८३२/७१ नविन वार्ड नं.१७ नविन मालमत्ता नं.१९२/७१ साईज पुर्व पश्चिम -, दक्षिण उत्तर -, चुर्तसिमा पुर्वे -गट नंबर ३६६, पश्चिम: ६.१० मीटर रस्ता, दक्षिण : गट नंबर ३६६ , उत्तर :प्लॉट नंबर १६, बाबु शेषेराव देशमुख सूर्यवंशी यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खता अधारे वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.त्यासंबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ७ दिवसांच्याअ ात लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा.अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत असे गृहीत धरून खरेदीखताच्या अधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**

## नगरपरिषद भोकर
### जाहीर प्रगटन
**नाव परिवर्तन करणे बाबत**

जा.क्र./नपभो/नानो६/-८७६

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,सुनिल पंढरीनाथ बच्चेवार यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.- गट.नं.- ५२ जुना वार्ड नं.-३ मधील प्लॉट नंबर -५७ मालमत्ता नं.२३४४/७२ नविन वार्ड नं.२ नविन मालमत्ता नं.३००७/११६ साईज पुर्व पश्चिम १२.१९ मी, दक्षिण उत्तर ९.१४ मीटर, चुर्तसिमा पुर्वे -प्लॉट नंबर ४३ व ४४, पश्चिम: ३० फुटाचा रस्ता , दक्षिण : प्लॉट नंबर ५८ , उत्तर :प्लॉट नंबर ५६, पिराजी पोशट्टी उल्लेवाड यांच्या नावाने असलेली मालमत्ता खरेदी खता अधारे वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे अशी विनंती संचिका सादर केली आहे. तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहित घेण्यात येत आहे.त्यासंबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ७ दिवसांच्याअ ात लेखी पुराव्यासह अर्ज सादर करावा.अन्यथा मुदतीनंतर कुणाचे काहीही आक्षेप नाहीत असे गृहीत धरून खरेदीखताच्या अधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**


## पाहिजेत

नांदेड येथील नॅशनल आय.टी.आय.मध्ये विविध तांत्रिक कोर्सेस मध्ये प्रवेश देण्यासाठी एका अनुभवी संबंधीत विषयातील पदविधर व्यक्तीची ADMISSION COUNSELOR प्रवेश प्रचारक ची नियुक्त करावयाची आहे. इच्छूक उमेदवारांनी ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसाच्या आत प्राचार्य, नॅशनल आय.टी.आय.माळटेकडी रोड नांदेड या पत्यावर आपले अर्ज सादर करावे.

**:प्राचार्य :**
**नॅशनल औद्योगिक प्रशिक्षण संस्था**
**मालटेकडी रोड, देगलूर नाका ,नांदेड**
**मो. ९०२८९८२४५१**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट, पहिला मजला,
शिवाजी नगर, नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## शासकीय सेवेत घेण्यासाठी अंगणवाडी सेविकांचे 'झेडपी'वर आंदोलन

**नांदेड (प्रतिनिधी)**– शासकीय कर्मचारी दर्जा देण्यात यावा, वेतनश्रेणी लागू करण्यात यावी, यासह अन्य मागण्यांसाठी जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांनी मंगळवारी (दि.१८) जिल्हा परिषदेसमोर आंदोलन केले. शासनासोबत झालेल्या बैठकांमधून निर्णयाची अंमलबजावणीही होत नसल्याने यावेळी संताप व्यक्त करण्यात आला. यावेळी शिष्टमंडळाच्या वतीने प्रशासनास निवेदन देण्यात आले.



बालविकास सेवा योजना ही शासनाची आस्थापना आहे, त्यांच्या कामाचे स्वरूप पाहता ते अर्धवेळ नसून पुर्णवेळ काम आहे. त्यांना मिळणाऱ्या मोबदल्याला मानधन म्हणता येणार नाही, तर ते वेतन आहे. त्यामुळे गुजरात उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अंगणवाडी सेविका व मदततीसांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा द्यावा.

सर्वोच्च न्यायालयाने पेमेंट ऑफ ग्रॅच्युईटी ॲक्ट नुसार, अंगणवाडी कर्मचारी या ग्रॅच्युईटीसाठीचा निकाल दिला आहे. त्यानुसार अंगणवाडी कर्मचाऱ्यांना विनाविलंब ग्रॅन्यूईटी देण्याचा शासकीय आदेश काढण्यात यावा. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना दरमहा पेन्शन देण्याबाबत सचिवांसोबत तसेच महिला बाल कल्याण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. यानुसार पेन्शनचा निर्णय घेण्यात यावा.

शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार अंगणवाडी केंद्राच्या कामांची वेळ ठेवण्यात आली आहे. त्यामध्ये एक तास गृहभेटीनुसार वेळ निश्चित करण्यात आली, अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या कामकाजात २ तासांची वाढ करण्यात आली आहे. वाढीव कालावधीमध्ये गरोदर महिला व स्तनदा मातांसदर्भात घेण्यात आलेल्या निर्णयाचा सकारात्मक विचार करावा, यासह अन्य मागण्यांसाठी राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाच्यावतीने मंगळवारी आंदोलन करण्यात आले. त्यानंतर शिष्टमंडळाच्या वतीने प्रशासनास निवेदन देण्यात आले.

## गांजाची तस्करी करणाऱ्या महिलेसह दोघांना पाच दिवसांची पोलीस कोठडी; २० किलो गांजा जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** – येथील जिल्हा न्यायालयाच्या पाठीमागून गांजा घेऊन जाणाऱ्या एका महिलेसह दोघांना वजिराबाद ठाण्यातील गुन्हे शोध पथकाने अटक केली. या दोघांकडून एक लाख ६० हजार रुपये किमतीचा २० किलो गांजा जप्त केला. या दोघांनाही १८ फेब्रुवारी रोजी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने पाच दिवस म्हणजेच २३ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडीत पाठवले आहे.



दि. १७ फेब्रुवारी रोजी रात्री न्यायालयाच्या पाठीमागील रस्त्याने दोघेजण गांजा विक्रीसाठी नेत असल्याची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक आणि वजिराबाद ठाण्याचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली विमानतळ, इतवारा, वजिराबाद गुन्हे शोध पथकातील पोलीस अंमलदार मोहन हाके, अर्जुन मुंढे, श्रीराम दासरे, दारा राठोड, माने यांनी सापळा रचून सदर दोघांना अडवले. त्यांच्या बॅगची तपासणी केली असता त्यात २०.५०० किलोग्रॅम गांजा आढळून आला. आरोपी मिर्झा नईम बेग मिर्झा करीम बेग (वय ३७, रा. किल्लारोड, महमदी मशिदजवळ) आणि अखतरी बेगम शेख मिया (वय ५०, रा. हतई इतवारा) यांना ताब्यात घेण्यात आले. पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्या फिर्यादीवरून वजिराबाद पोलीस ठाण्यात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत लोंढे करत आहेत.

## विष्णुपुरी येथे शिवजयंती निमित्त आज विविध स्पर्धा

**नांदेड (प्रतिनिधी)** – विष्णुपुरी येथे बुधवारी सार्वजनिक शिवजयंतीनिमित्त रक्तदान शिबीर, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, सूर्यनमस्कार आदी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

वैद्यकीय महाविद्यालय विष्णुपुरी चे अधिष्ठिता डॉ. सुधीर देशमुख रक्तदान शिबीराचे उद्घाटन करणार आहेत. सकाळी गावातून शोभायात्रा आणि पालखी मिरवणूक निघणार आहे. यावेळी जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी येथील विद्यार्थ्यांचे लेझीम पथक मिरवणुकीत लेझीम सादर करणार आहेत. संध्याकाळी सात वाजता शिवरायांसी का आठवावे या विषयावर प्रसिद्ध व्याख्याते डॉ. विश्वाधार देशमुख यांचे व्याख्यान होणार आहे. विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे. या कार्यक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन शिवजयंती समीतीचे अध्यक्ष माणिकराव हंबर्डे, सचिव मारोती हंबर्डे, कोषाध्यक्ष रामचंद्र शेंबोले, शिवाजी हंबर्डे आणि ग्रामस्थांनी केले आहे.

## किनवटच्या तहसीलदार चौंडेकर यांचा वकील संघाकडून निषेध

**किनवट (प्रतिनिधी)** – न्यायालयीन कामकाजासाठी तहसील कार्यालयात गेलेल्या वकिलाचा पक्षकारासमोर अवमान केल्याप्रकरणी किनवटच्या वकील संघाने तहसीलदार शारदा चौंडेकर यांचा निषेध करुन त्यांच्यावर कारवाईची मागणी केली.

यासंदर्भात किनवटच्या दिवाणी न्यायाधीशांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, वकील विलास सूर्यवंशी हे दि. ५ फेब्रुवारी रोजी पक्षकारासोबत न्यायालयीन कामकाजासाठी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी कार्यालयात गेले होते. त्यावेळी तहसीलदार शारदा चौंडेकर यांनी पक्षकारासमक्ष ॲड. सूर्यवंशी यांना उद्देशून अवमानकारक व वकिली व्यवसायाची अवमूल्यन करणारी भाषा केली.शिवाय, सूर्यवंशी यांच्या पक्षकाराला 'यांना कशाला वकील म्हणून लावले' असा प्रश्न करत पुन्हा सूर्यवंशी यांचा अवमान केला. तालुका दंडाधिकाऱ्यांच्या या कृतीचा किनवट वकील संघाने निषेध केला. अवमानाच्या निषेधार्थ वकील संघाने सोमवारी दि.१७ रोजी न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार टाकला. वकिलाचा अवमान करणाऱ्या तहसीलदारांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी वकील संघाने केली आहे. दिवाणी न्यायाधीशांना निवेदनावर वकील संघाचे अध्यक्ष ॲड. राहुल सोनकांबळे, उपाध्यक्ष एस. एम. राठोड, सचिव एस. पी. शिरपुरे, कोषाध्यक्ष एम. एम. बडगुजर आदींच्या सह्या आहेत.

## शिवजयंतीदिनी 'मिशन यूपीएससी' ग्रंथ प्रकाशन सोहळा

**नांदेड (प्रतिनिधी)** – छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त १९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता आंबेडकरवादी मिशनमध्ये डॉ. यशवंत चव्हाण लिखित 'मिशन यूपीएससी' या ग्रंथाच्या हिंदी आवृत्तीचे पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात येणार आहे.

यावेळी कै. शिधोजीराव बाबाराव पाटील चव्हाण यांच्या स्मरणार्थ अनिल मोरे यांचे 'महाराष्ट्रातील विद्यार्थांचा युपीएससी परीक्षेत सहभाग वाढवण्याचे उपाय' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

जयंती सोहळ्यास माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे, डीएनबी कार्डिओलॉजिस्ट डॉ. कांबळे, डॉ. भास्कर दवणे, डॉ. रवी सरोदे, डॉ. इरवंत पल्लेवाड, शिवाजी कपाळे, सह आयुक्त रेणुका तम्मलवार व हर्षद विकास, प्रादेशिक परिवहन अधिकारी निमसे, डीसीबी बँक व्यवस्थापक प्रीती जमदाडे, प्राचार्य सुरेश घुले, बीएसएनएलचे इंजि पी. पडघणे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम यांनी केले आहे.

## महावितरण विद्युत भवनात शिवजन्मोत्सवाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** – महावितरणच्या विद्युत भवन येथे १९ रोजी सकाळी ९.३० वाजता शिवजन्मोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापारेषणचे संचालक सतीश चव्हाण राहतील. उद्घाटक म्हणून महावितरणचे कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर, शिवव्याख्याते राहुल गिरी तर प्रमुख पाहुणे छत्रपती संभाजीनगर येथील महापारेषणचे मुख्य अभियंता नसीर कादरी, भांडूप परिमंडळाचे महावितरणचे मुख्य अभियंता सुनील काकडे नांदेडचे मुख्य अभियंता राजाराम माने, अधीक्षक अभियंता नांदेड सुधाकर जाधव, अधीक्षक अभियंता हिंगोली राजेशसिंग चव्हाण, अधीक्षक अभियंता परभणी रुपेश टेंभुर्णे, निधी गौतम अधीक्षक अभियंता पायाभूत आराखडा नांदेड यांची उपस्थिती राहणार आहे. राष्ट्रसिंह शिवशाहीर सुरेश जाधव पोवाडा होणार आहे. या सोहळ्यास सर्वांनी सहकुटुंब उपस्थित राहावे, असे आवाहन नांदेड परिमंडळातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## यशवंतराव पाटील जाधव यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)**– सुगाव (ता.लोहा) येथील ज्येष्ठ नागरिक यशवंतराव तुळशीराम पाटील जाधव (वय ९२) यांचे दि.१८ रोजी पहाटे साडेपाचच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी पाच वाजता सुगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, सुना, नातू, पणतू असा परिवार आहे. दतराम पाटील जाधव व डॉ. भगवानराव पाटील जाधव यांचे ते वडील होत.

## श्रीमती सुभद्रा पांडे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** – सिडको येथील ज्येष्ठ महिला श्रीमती सुभद्राबई मारोतराव पांडे (वय ८०) यांचे दि. १८ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवदेहावर बुधवारी १९ रोजी दुपारी १ वाजता रुई (बु.) येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातू, पणतु असा परिवार आहे. जिजाऊ सृष्टी प्रतिष्ठानचे अध्यक्ष सोपान पांडे यांच्या त्या काकू होत.




## चोरीच्या ८ दुचाकी, मोबाईलसह चोरटा जेरबंद; 'स्थागुशा'ची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्ह्याभरात दुचाकी चोरी करणाऱ्या एका चोरट्यास सावरी (ता. किनवट) येथे पकडण्यात आले. स्थानिक गुन्हा शाखा पथकाने केलेल्या कारवाईत चोरीच्या ८ दुचाकी, १ मोबाईल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दुचाकी चोरीच्या गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्याच्या सूचना पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला दिल्या आहेत. यानुसार पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी आपल्या पथकाने दिलेल्या माहिती आधारे दि. १७ रोजी सायरी-डोंगरगाव रस्त्यालगत ता. किनवट येथे आरोपी बालाजी ऊर्फ सुनिल चतरु मसे (वय २४ रा. सावरी) यास ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने जिल्ह्यात दुचाकींची चोरी केली असल्याचे सांगितले. या माहितीवरून या चोरट्याच्या ताब्यातून ८ दुचाकी व एक मोबाईल असा एकूण ३ लाख ३ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. चोरट्याने जिल्ह्यातील व इतर राज्यातही दुचाकी चोरी केल्याचे कबूल केले आहे.

ही कारवाई 'स्थागुशा'चे पोउपनि साईनाथ पुयड, पोलीस अंमलदार सुरेश घुगे, बालाजी कदम, संदीप घोगरे, विलास कदम, गणेश धुमाळ, तिरुपती तेलंग, बिचकेवार, अमोल पेचारे सायबर सेल येथील अंमलदार राजू सिटीकर, दीपक ओढणे, मुंडे आदींच्या पथकाने केली.




**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com